नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ३०५ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे

POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026



मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

सुट्टीची सुचना

आज मंगळवार, दि. २० ऑक्टोबर २०२६ रोजी "दसरा व विजयादशमी निमित्त" दै. स. गांवकरी कार्यालयाला सुट्टी असल्याने बुधवार, दि. २१ ऑक्टोबर २०२६ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, विक्रेते, एजंट यांनी नोंद घ्यावी.

- संपादक-व्यवस्थापक

थोडक्यात...

भारताची नंबर 1 EV* आता INDULGE साठी सज्ज!

पुणे (स. गांवकरी) : JSW MG Motor India ने आज MG Windsor INDULGE Edition लॉन्च करण्याची घोषणा केली. ही भारतातील नंबर 1 EV* ची आणखी शानदार आवृत्ती आहे. 38-kWh बॅटरी पॅकसह सुसज्ज असलेली ही गाडी 100 kW (136 PS) पॉवर आणि 200 Nm टॉर्क देते, तर तिची प्रमाणित रेंज 332 km# आहे. MG Windsor च्या फ्यूचरिस्टिक डिझाइन, प्रशस्त इंटीरियर आणि खास Business-Class आरामाला पुढे नेत, INDULGE Edition वेगळेपणाची नवी पातळी सादर करते. या स्पेशल एडिशनमध्ये Shadow Gold बॉडी कलर आणि त्याला कॉन्ट्रास्ट करणारी Black रूफ असलेले आकर्षक ड्युअल-टोन एक्सटीरियर आहे. Black ORVMs, R-18 Black Alloy Wheels आणि C-pillar वरील खास 'INDULGE' बॅजिंग तिचे प्रीमियम व्यक्तिमत्त्व अधिक ठळक करतात आणि गाडीला दमदार, सहज ओळखता येणारी ओळख देतात.

केबिनमध्ये खास Urban Tan आणि Black अपहोल्स्ट्री थीम देण्यात आली आहे, ज्यामुळे प्रीमियम वातावरण अधिक उबदार आणि परिष्कृत बनते. पुढील हेडरेस्टवर खास 'INDULGE' एम्ब्रॉयडरी असून ती या एडिशनची वेगळी ओळख अधिक ठळक करते. Business-Class अनुभव आणखी चांगला करण्यासाठी MG Windsor INDULGE Edition मध्ये दुसऱ्या रांगेतील प्रवाशांसाठी 'PRIVE Screen' स्टँडर्ड स्वरूपात देण्यात आली आहे. त्यामुळे मागील सीटवरील प्रवाशांना अधिक सुविधा आणि मनोरंजन मिळते.

'गोकुळ'वर सतेज पाटलांचा झेंडा: हसन मुश्रीफ यांच्या 'महायुती'ला धक्का

कोल्हापुर : (स. गांवकरी)



कोल्हापुरातील प्रतिष्ठेची लढाई मानली जाणारी म्हणजे गोकुळ दूध उत्पादक संघाची निवडणूक. या निवडणुकीची राज्यभर चर्चा सुरू आहे. ही निवडणूक जिंकण्यासाठी कॉंग्रेस नेते सतेज पाटील आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे नेते व मंत्री हसन मुश्रीफ यांनी आपली संपूर्ण ताकद पणाला लावली होती. या निवडणुकीचे मतदान पार पडले असून मतमोजणीही पूर्ण झाली आहे. यात सतेज पाटील यांचे पॅनल विजयी झाले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून गोकुळ दूध संघावर असलेले महाडिक घराण्याचे वर्चस्व मोडीत काढत, यंदाच्या निवडणुकीत सतेज पाटील यांनी समविचारी आघाडीची सत्ता स्थापन करून महायुतीला मोठा धक्का दिला आहे. या निवडणुकीत पारंपरिक राजकीय घराण्यांतील अनेक दिग्गज नेते मैदानात असले तरी, मतदारांनी महायुतीच्या दोन प्रमुख नेत्यांना चांगलाच दणका दिला. मंत्री हसन मुश्रीफ यांच्या चिरंजीवांच्या पराभवानंतर, आता शौमिका महाडिक यांनाही अवघ्या 7 मतांनी पराभवाचा सामना करावा लागला.

महायुतीप्रणीत छत्रपती शाहू शेतकरी विकास आघाडीच्या उमेदवार शौमिका अमल महाडिक यांना कॉंग्रेसप्रणीत सतेज पाटील यांच्या राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीचे उमेदवार राजू जयवंतराव आवळे यांच्याकडून अवघ्या 7 मतांनी पराभव स्वीकारावा लागला. या निसटत्या पराभवामुळे महाडिक कुटुंबासह भाजप आणि महायुतीला मोठा राजकीय धक्का बसला आहे. गोकुळ दूध संघाच्या संचालक मंडळाच्या 25 जागांसाठी 50 उमेदवार निवडणुकीत उतरले आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील 5 हजार 418 पात्र मतदारांपैकी 5 हजार 416 मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. आतापर्यंतच्या आकडेवारीनुसार महायुती पुरस्कृत राजर्षी शाहू शेतकरी विकास आघाडीला चांगलाच धक्का बसला आहे. कारण या ठिकाणी एकूण 25 जागांपैकी 14 जागांवर सतेज पाटील यांच्या नेतृत्वातइल राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीचे उमेदवार आघाडीवर आहेत. तर अन्य 11 जागांवर महायुतीचे उमेदवार आघाडीवर आहेत. सतेज पाटील यांच्या या यशावर कॉंग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी ट्विट करत म्हटले की, कोल्हापूरमध्ये 'बंटी' पॅटर्नचा ऐतिहासिक विजय! कोल्हापूरची भाग्यवाहिनी असलेल्या गोकुळ दूध संघाच्या पंचवार्षिक निवडणुकीत राजर्षी शाहू शेतकरी समविचारी आघाडीने आमदार सतेज (बंटी) पाटील यांच्या नेतृत्वात मिळवलेल्या अभूतपूर्व आणि दणदणीत विजयाबद्दल सर्व नवनियुक्त संचालकांचे मनःपूर्वक अभिनंदन! हा विजय केवळ एका दूधसंघाच्या निवडणुकीचा विजय नसून, तो कोल्हापूरची स्वायत्तता आणि अस्मिता टिकवून ठेवण्यासाठी लढलेल्या ऐतिहासिक लढाईचा विजय आहे. गुजरातच्या 'अमूल' आणि महाशक्तींचे आक्रमण रोखण्यासाठी, कोणताही मोठा राजकीय पाठिंबा नसताना, सतेज पाटील यांनी एकट्याच्या हिमतीवर ही बलाढ्य लढाई लढून 'गोकुळ' महाशक्तींच्या घशात जाण्यापासून वाचवला आहे. त्यामुळे हा विजय कोल्हापूरच्या 5 लाख दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या विश्वासाचा विजय आहे, अशी प्रतिक्रिया वडेट्टीवार यांनी दिली आहे.

खरवली देवी मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी ५ कोटींचा निधी

ठाणे : (स. गांवकरी)

शिळफाटा येथील खरवली देवी मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या निधीतून ५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार हा निधी मंजूर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. या विकासकामांचा शुभारंभ सोमवारी, दि. १९ ऑक्टोबर रोजी सकाळी करण्यात आला.

स्थानिक आमदार राजेश मोरे आणि माजी उपमहापौर तथा दिवा शहरप्रमुख रमाकांत मढवी यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ झाला. यावेळी नगरसेवक बाबाजी पाटील, प्रभाग समिती अध्यक्ष दीपक जाधव आणि नगरसेविका अर्चना निलेश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. या निधीतून खरवली देवी मंदिर परिसराचे सुशोभीकरण करून भाविकांसाठी परिसर अधिक सुविधायुक्त करण्यावर भर दिला जाणार आहे.

कार्यक्रमाला उपशहरप्रमुख चंदू अलिमकर, विभागप्रमुख गणेश मुंडे, निलेश पाटील, खरवली देवस्थानचे अध्यक्ष वैभव अलिमकर, सुंदर अलिमकर, मधुकर पाटील, नवनाथ पाटील, दिपेश पाटील, शाखाप्रमुख जयंता वालिलकर, रुपेश भोईर, दिनेश मोरे, बाबुराव मुंडे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. खरवली देवी मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाल्याने परिसराच्या विकासाला चालना मिळणार असून भाविकांसाठीही अधिक चांगल्या सुविधा निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



सहकार, सामाजिक कार्य आणि पत्रकारितेत नेतृत्वाचा ठसा; सौ. परिघा आरोटेंना 'आरंभ पर्व नवदुर्गा पुरस्कार २०२६' प्रदान!

महापौर मंजुषाताई नागपुरे, तृप्तीताई देसाईंसह मान्यवरांची उपस्थिती; सौ. परिघा विश्वास आरोटे यांच्या बहुआयामी कार्याचा गौरव

पुणे : (स. गांवकरी)

सहकार क्षेत्रातील नेतृत्व, संस्थात्मक व्यवस्थापन आणि माध्यम क्षेत्रातील योगदान अशा विविध क्षेत्रांत आपल्या कार्याचा ठसा उमटविणाऱ्या सौ. परिघा विश्वास आरोटे यांना 'आरंभ पर्व राज्यस्तरीय नवदुर्गा पुरस्कार २०२६' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. दैनिक आरंभ पर्वच्या वतीने, यशस्विनी विकास प्रतिष्ठान, पुणे आणि पुणे प्रहार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या पुरस्कार सोहळ्यात त्यांच्या बहुआयामी कार्याची दखल घेण्यात आली.

रविवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी सिल्वर पेटल्स हॉल, धायरी फाटा, सिंहगड रोड, पुणे येथे हा सोहळा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाला पुण्याच्या महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सौ. तृप्तीताई देसाई आणि यशस्विनी विकास प्रतिष्ठानच्या संस्थापिका सौ. सुनिता डांगे यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच अभिनेत्री मोनालीसा बागल, अभिनेत्री, मॉडेल व निवेदिका मयुरी नव्हाते, अभिनेत्री स्नेहा बालपांडे आणि अभिनेत्री सुप्रिया धोत्रे यांची उपस्थिती हे या सोहळ्याचे विशेष आकर्षण ठरले.

दैनिक आरंभ पर्वच्या संस्थापिका तथा संपादिका मा. सौ. सुरेखा मते, व्यवस्थापकीय संपादक मा. श्री. प्रतिक गंगणे, निवासी संपादक मा. श्री. लक्ष्मण साबळे आणि विपणन प्रमुख मा. श्री. अभिषेक मरगळे यांचीही या सोहळ्याला उपस्थिती होती. सौ. परिघा विश्वास आरोटे या महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या संचालिका, चितळवेढे विविध कार्यकारी सेवा सोसायटीच्या संचालिका, मुक्ताई मजूर सहकारी संस्थेच्या चेअरमन तसेच दैनिक समर्थ गावकरी समूहाच्या संचालिका म्हणून विविध जबाबदाऱ्या सांभाळत आहेत. सहकार, संस्था व्यवस्थापन आणि माध्यम क्षेत्राशी संबंधित त्यांच्या कार्याचा आवाका त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देतो. विविध संस्थांमध्ये नेतृत्वाची जबाबदारी पार पाडताना त्यांनी सहकार आणि संस्थात्मक कामकाजाच्या क्षेत्रांत योगदान दिले आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत नवदुर्गा पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. महिलांनी विविध क्षेत्रांत पुढाकार घेऊन नेतृत्वाच्या भूमिका समर्थपणे पार पाडाव्यात, या विचारालाही त्यांच्या कार्यातून प्रोत्साहन मिळते.



नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर आयोजित 'आरंभ पर्व राज्यस्तरीय नवदुर्गा पुरस्कार २०२६' या सोहळ्यात सामाजिक कार्य, शिक्षण, पत्रकारिता, आरोग्य, सहकार, उद्योजकता, कला आणि सौंदर्य क्षेत्रातील एकूण ३१ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. महिलांच्या कार्याची दखल घेणे, त्यांच्या योगदानाला व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि समाजासमोर प्रेरणादायी उदाहरणे ठेवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. विविध क्षेत्रांत कार्यरत महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करणारा हा सोहळा नारीशक्तीच्या सन्मानाचा विशेष उपक्रम ठरला. सौ. परिघा विश्वास आरोटे यांना प्रदान करण्यात आलेला नवदुर्गा पुरस्कार त्यांच्या सहकार, संस्था व्यवस्थापन आणि माध्यम क्षेत्रातील कार्याचा गौरव करणारा ठरला.

मागास समाज सेवा मंडळाच्या शिक्षण संस्थेत अध्यक्षपदावरून भावकीतील वाद चव्हाट्यावर

सोलापूर : (स. गांवकरी)



मागास समाज सेवा मंडळाच्या शिक्षण संस्थेत अध्यक्षपदावरून भावकीतील वाद चव्हाट्यावर आला असून दोन गट पडले आहेत. यामुळे शाळेसमोर दोन गटांचे वेगवेगळे अध्यक्ष असलेल्या डिजिटल फलकांची मोठी गर्दी झाली आहे.

बघा, चव्हाण गुरुजी तुमच्या संस्थेत काय चाललय अशी म्हणण्याची वेळ सध्या संस्थाचालक स्वर्गीय चंद्रामvचव्हाण गुरुजी यांचे चिरंजीव सुभाष चव्हाण यांच्या वर आली आहे.

दलित मित्र स्वर्गीय चंद्राम चव्हाण गुरुजी यांनी स्थापन केलेल्या मागास समाजसेवा मंडळाचे सध्या अध्यक्षपदावरून भावकीतील वाद चांगलाच चव्हाट्यावर आला आहे. काका पुतण्यातील हा वाद आता न्यायालयीन प्रक्रियेपर्यंत जाणार असल्याची चर्चा ऐकण्यास मिळते.

मिळालेल्या माहितीनुसार एका वृत्तपत्र जाहिरातीमध्ये दिनांक 19 ऑक्टोबर सोमवारी या रोजी दोन विविध जाहिराती प्रसिद्ध झाल्या. त्यामध्ये एका जाहिरातीमध्ये सुभाष चव्हाण यांची अध्यक्षपदी निवड झाली असे आहे तर दुसऱ्या जाहिरातीमध्ये सचिन चव्हाण यांची अध्यक्षपदी निवड झाली असे जाहिरात प्रकाशित करण्यात आल्या आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार मागील अनेक वर्षापासून काका पुतण्यामध्ये संस्थेच्या अध्यक्षपदावरून वाद दिसून येतो. स्वर्गीय चंद्राम चव्हाण गुरुजी यांनी ही संस्था स्थापन करून आपल्या बंजारा समाजाचे अनेक विद्यार्थी घडवण्यात सिंहाचा वाटा उचलण्यात या संस्थेने मोलाचे कार्य केले आहे परंतु सद्यस्थिती पाहता संस्थेमधील वाद चव्हाट्यावर आले आहे.

आता दोन परस्पर झाल्याने संस्थेतील कर्मचारी व विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमावस्था निर्माण झाले आहे. अध्यक्ष झाल्यानंतर दिलेल्या जाहिरातीमध्ये राजकीय नेत्यांच्या फोटोवरून एकीकडे कॉंग्रेस आणि दुसरीकडे भाजप शिवसेना असे पुरस्कृत अध्यक्ष आहेत. पण मिळालेल्या माहितीनुसार ज्येष्ठ नेते सुभाष चव्हाण हेच संस्थेचे अधिकृत अध्यक्ष असल्याचे सांगण्यात आले आहे. पण भविष्यात हा वाद निश्चित न्यायालयात जाईल यात कोणतीही शंका नाही.

जेष्ठ शिक्षण महर्षी चंद्राम चव्हाण गुरुजी यांच्या शिक्षण संस्थेमध्ये राजकारण घुसले असून कॉंग्रेस विचारांचे स्वर्गीय चंद्राम चव्हाणा गुरुजी होते पुढे त्यांचे चिरंजीव सुभाष चव्हाण देखील कॉंग्रेस विचारावर वाटचाल सुरू ठेवली आहे. परंतु त्यांचा पुतण्या सचिन चव्हाण याने भाजप शिवसेना पुरस्कृत नेतेमंडकींच्या सहकार्याने संस्थेत हक्क सांगून आपणच संस्थेचे अध्यक्ष असल्याचा दावा केला आहे.

सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटीमध्ये सरस्वती पूजनाचा सोहळा उत्साहात संपन्न

पुणे : (स. गांवकरी)



सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटी, पुणे येथे शनिवारी सरस्वती पूजन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. ज्ञान, विद्या, बुद्धी आणि संस्कार यांचे प्रतीक असलेल्या देवी सरस्वतीचे पूजन करून या वेळी आदरभाव व्यक्त करण्यात आला.

याप्रसंगी, सिंबायोसिस चे संस्थापक व अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार आणि सिंबायोसिस स्किल्स अँड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, पुणे तसेच सिंबायोसिस युनिव्हर्सिटी ऑफ अप्लाइड सायन्स, इंदोरच्या कुलपती डॉ. स्वाती मुजुमदार यांच्या हस्ते सरस्वतीमातेचे पूजन करण्यात आले.

देवी सरस्वतीचे मंगलमय रूप, महाकालीचा रुद्रावतार, पश्चिम बंगालमधील पारंपरिक धुनुची नृत्य आणि महिषासुरमर्दिनी स्तोत्राच्या सादरीकरणातून भक्ती, संस्कृती आणि कलेचा सुरेल संगम अनुभवायला मिळाला. या सोहळ्यात विद्यार्थ्यांनी नृत्य आणि संगीताच्या माध्यमातून नवदुर्गांचा जागर केला. विविधरंगी वेशभूषा आणि प्रभावी कलाविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली.

यावेळी सौ. संजीवनी मुजुमदार, संचालिका, डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्यूझीयम व मेमोरिअल; डॉ. विद्या येरवडेकर, कुलपती, सिंबायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी; डॉ. राजीव येरवडेकर, प्रोव्होस्ट, वैद्यकीय व आरोग्य विज्ञानशाखा, सिंबायोसिस इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी; एअर मार्शल भूषण गोखले (निवृत्त), माजी उपवायुसेनाप्रमुख; एअर कमोडोर प्रमोद पुराणिक (निवृत्त), उपाध्यक्ष, भारत फोर्ज; श्री. अनंत रंजन, वरिष्ठ व्यवस्थापन व्यावसायिक; मेजर सोनाली कदम (निवृत्त), संचालक, एससीडीएल; आशिष लिमगिरे, कुलसचिव, सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटी आणि शरद पुलाटे, कुलसचिव, एससीडीएल व इतर मान्यवर उपस्थित होते.

डॉ. स्वाती मुजुमदार म्हणाल्या, "नवरात्रोत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही सिंबायोसिस ओपन एज्युकेशन सोसायटीमध्ये नवदुर्गांच्या जागराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नृत्य आणि संगीताविष्कारातून भक्ती, संस्कृती आणि विद्येचा सुरेल संगम अनुभवायला मिळाला."

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी संपादकीय

वाईटावर चांगल्याच्या विजयाचा संकल्प!

भारतीय संस्कृतीत सण-उत्सवांना केवळ धार्मिक महत्त्व नाही, तर त्यामागे जीवनाला दिशा देणारा विचारही दडलेला आहे. दसरा अर्थात विजयादशमी हा असाच एक प्रेरणादायी सण. प्रभू श्रीरामांनी रावणाचा केलेला वध आणि देवी दुर्गेने महिषासुराचा केलेला पराभव या पौराणिक कथांमधून वाईट प्रवृत्तींचा नाश करून चांगल्या विचारांचा विजय प्रस्थापित करण्याचा संदेश मिळतो. मात्र, आजच्या काळात या संदेशाचा खरा अर्थ समजून घेऊन तो आपल्या आचरणात आणण्याची गरज अधिक प्रकर्षाने जाणवते.

आज समाज प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असला, तरी भ्रष्टाचार, अन्याय, महिला अत्याचार, बेरोजगारी, व्यसनाधीनता, अंधश्रद्धा आणि सामाजिक विषमता यांसारख्या अनेक समस्या आपल्यासमोर उभ्या आहेत. एकीकडे आपण दसऱ्याला रावणाच्या प्रतिमांचे दहन करतो, तर दुसरीकडे आपल्या समाजात अहंकार, द्वेष, मत्सर, लोभ आणि स्वार्थ यांच्या रूपाने रावण जिवंत ठेवतो. त्यामुळे केवळ पुतळ्यांचे दहन करून चालणार नाही, तर मनातील वाईट प्रवृत्तींचे दहन करणे हाच विजयादशमीचा खरा उद्देश असला पाहिजे. रावणाचे दहन मैदानावर नव्हे, तर प्रत्येकाच्या मनात झाले पाहिजे!

दसरा हा सीमोल्लंघनाचा सण म्हणूनही ओळखला जातो. पूर्वीच्या काळी या दिवशी गावाच्या सीमा ओलांडून नवीन संकल्पांसह पुढील वाटचाल करण्याची परंपरा होती. आज या परंपरेचा व्यापक अर्थ समजून घेण्याची आवश्यकता आहे. जातिभेदाच्या सीमा ओलांडूया, धर्माच्या नावावर होणारे द्वेषाचे राजकारण दूर ठेवूया, अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाकडे जाऊया आणि निराशेच्या गर्तेतून आशेच्या प्रकाशाकडे वाटचाल करूया. माणसामाणसांतील अंतर कमी करून बंधुभाव, समता आणि सामाजिक सलोखा वाढविणे हेच खरे सीमोल्लंघन ठरेल.

आज महिलांच्या सक्षमीकरणाच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जातात; परंतु महिलांना सुरक्षित वातावरण, समान संधी आणि सन्मान मिळतो का, हा प्रश्न अजूनही महत्त्वाचा आहे. विजयादशमीच्या निमित्ताने स्त्रीशक्तीचा गौरव करताना प्रत्येक मुलगी आणि महिला निर्भयपणे जगू शकेल, यासाठी समाजाने ठोस भूमिका घेतली पाहिजे. देवीची पूजा करणाऱ्या समाजाने स्त्रीचा सन्मान आपल्या दैनंदिन वर्तनातूनही सिद्ध केला पाहिजे. शेतकरी, कामगार, कष्टकरी, तरुण आणि सर्वसामान्य नागरिक यांच्या आयुष्यात सुख, सुरक्षितता आणि स्थैर्य निर्माण होणे हीच विकासाची खरी कसोटी आहे. सण साजरे करताना गरजूंच्या चेहऱ्यावर हास्य फुलविणे, गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत करणे, पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि सार्वजनिक जीवनात प्रामाणिकपणा जपणे, अशा कृतींमधून सणांचा सामाजिक अर्थ अधिक समृद्ध होतो.

दसऱ्याच्या दिवशी आपट्याची पाने सोने म्हणून देण्याची परंपरा आहे. या परंपरेमागील स्नेहभाव जपत असताना माणुसकीचे सोनेही एकमेकांना देण्याचा संकल्प आपण केला पाहिजे. नात्यांमध्ये विश्वास, व्यवहारात प्रामाणिकपणा, समाजात बंधुभाव आणि सार्वजनिक जीवनात उत्तरदायित्व असेल, तरच आपल्या संस्कृतीतील मूल्यांचे खऱ्या अर्थाने जतन होईल.

आजच्या काळात विजयादशमीचा संदेश केवळ वैयक्तिक जीवनापुरता मर्यादित नाही. शासन, प्रशासन, सामाजिक संस्था, राजकीय नेतृत्व आणि नागरिक या सर्वांनी आपापल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडल्या पाहिजेत. अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे, चुकीच्या गोष्टींना विरोध करणे आणि सत्याच्या बाजूने ठाम उभे राहणे, हे प्रत्येक जागरूक नागरिकाचे कर्तव्य आहे. सणांच्या झगमगाटात त्यामागील विचार हरवू नये. फटाके, रोषणाई आणि उत्सव यांच्यापलीकडे जाऊन समाजहिताचा विचार करणे आवश्यक आहे. पर्यावरणपूरक उत्सव साजरे करणे, सार्वजनिक स्वच्छता राखणे आणि शांतता व सलोखा जपणे, हीदेखील काळाची गरज आहे.

विजयादशमी आपल्याला शिकवते की, संघर्ष कितीही मोठा असला तरी सत्य, संयम, धैर्य आणि सदाचार यांच्या बळावर विजय मिळवता येतो. प्रत्येकाने स्वतःमधील दोष ओळखून ते दूर करण्याचा प्रयत्न केला, तर कुटुंब, समाज आणि राष्ट्र अधिक सक्षम होईल.

चला, या दसऱ्याला केवळ परंपरेचे पालन न करता परिवर्तनाचा संकल्प करूया. मनातील अहंकार, द्वेष आणि स्वार्थ यांचे दहन करूया. अन्यायाविरुद्ध उभे राहूया, माणुसकीचे नाते जपूया आणि समाजात सत्य, समता व बंधुभावाची ज्योत प्रज्वलित करूया. कारण खरा विजय रावणाच्या पुतळ्याच्या दहनात नाही, तर माणसातील वाईट प्रवृत्तींच्या अंतात आहे. हाच दसऱ्याचा संदेश आणि हाच विजयादशमीचा खरा विजय!

थोडक्यात पण महत्वाचे



डॉ.देखणेंना 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार २०२४' प्रदान

आळंदी (स. गांवकरी) : महाराष्ट्राच्या लोककलेसाठी अभिमानाचा क्षण श्री संत ज्ञानेश्वर महाराज संस्थान, आळंदीचे प्रमुख विश्वस्त तथा प्रसिद्ध कीर्तनकार, भारुडकार, प्रवचनकार डॉ. भावार्थ देखणे यांना केंद्र शासनाच्या संगीत नाटक अकादमीतर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार २०२४' सोमवारी (दि. १९) प्रदान करण्यात आला. नवी दिल्ली येथील रवींद्र भवनच्या मेघदूत थिएटरमध्ये हा भव्य पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात झाला. केंद्रीय सांस्कृतिक आणि पर्यटन मंत्री मा. ना. गजेंद्रसिंह शेखावत यांच्या हस्ते डॉ. देखणे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमास सचिव,भारत सरकार सांस्कृतिक मंत्रालय विवेक अग्रवाल विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. संगीत नाटक अकादमीच्या अध्यक्षा श्रीमती संध्या पुरेचा यांनी सोहळ्याचे प्रास्ताविक केले. या वर्षी अकादमीकडून सन २०२४ सालासाठी देशभरातील एकूण ५१ कलाकारांना तर २०२५ सालासाठी ५५ कलाकारांना युवा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सन २०२४ च्या पुरस्कारांमध्ये लोककला प्रकारात महाराष्ट्रातून पुरस्कार डॉ. भावार्थ देखणे यांना 'भारुड' या प्रबोधनात्मक लोककलेतील उल्लेखनीय योगदानाबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. भारुडाच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाचा आणि लोकप्रबोधनाचा वारसा देशभर तसेच परदेशात पोहोचवण्याच्या त्यांच्या कार्याची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे. आळंदी जनहित फाउंडेशन कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, अध्यक्ष राजेंद्र घुंडरे पाटील यांनी डॉ. देखणे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

महाराजा कॉलेजला खो-खो जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक

श्रीगोंदा (स. गांवकरी) : दिनांक 16 ऑक्टोबर 2026 रोजी बुऱ्हाणनगर जिल्हा अहिल्यानगर येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय शालेय 19 वर्षे मुली खो-खो स्पर्धेमध्ये महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयातील खेळाडूंनी अतिशय उल्लेखनीय कामगिरी करत प्रथम दोन फेरी मध्ये प्रथम फेरीमध्ये पाथर्डी व कॉटर फायनल मध्ये नगर तालुका संघांना हरवत सेमी फायनल मध्ये प्रवेश केला. सेमी फायनल मध्ये कर्जत संघाविरुद्ध पराभव पत्करावा लागला. परंतु तिसऱ्या नंबर साठी यश मिळवत तृतीय क्रमांक मिळवला अभिमानाची गोष्ट म्हणजे आपल्या संघातील उत्कृष्ट खेळी करणारे दोन खेळाडू समीक्षा गरुड व नम्रता हरिहर यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या यशाबद्दल महाविद्यालयीन विकास समितीचे चेअरमन मा. आ. बबनराव पाचपुते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य मा. बाबासाहेब भोस, मा. आ. राहुल जगताप, सदस्य महावीर पटवा, क्रीडा समितीचे अध्यक्ष सचिन जामदार, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे, वरिष्ठ उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, ज्युनिअर उपप्राचार्य प्रा. श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे, विभागप्रमुख प्रा उषा बोरुडे, प्रा विजय मगर, प्रा संदीप दरेकर, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खेळाडूंचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

पाणीप्रश्नासाठी जनता दरबारात पालकमंत्री गणेश नाईक यांना निवेदन

ठाणे : (स. गांवकरी)

दिवा शहरातील गंभीर पाणीटंचाई आणि अनियमित पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर जनता दरबारात पालकमंत्री तथा वनमंत्री गणेश नाईक यांच्याकडे दिवा मनसे विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी निवेदन सादर केले. ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे आयोजित जनता दरबारात नागरिकांनी पालकमंत्र्यांची भेट घेत दिव्यातील पाणीप्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले.

दिवा शहराची लोकसंख्या वाढत असताना अनेक भागांमध्ये अपुरा आणि अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले. शहराला मंजूर असलेले पाणी प्रत्यक्षात पूर्ण क्षमतेने मिळते का, याची खातरजमा करण्याची मागणीही करण्यात आली.

विशेषतः आगासन फाटक येथे मीटर बसवून दिवा शहराला प्रत्यक्षात ४० एमएलडी पाणी मिळते की नाही, याची तपासणी करावी, पाणीपुरवठ्यातील अनियमितता दूर करून नागरिकांना पुरेशा प्रमाणात पाणी उपलब्ध करून द्यावे, तसेच पाण्याची चोरी आणि बेकायदा व्यवहार करणाऱ्या पाणीमाफियांवर कठोर कारवाई करावी, अशा प्रमुख मागण्या निवेदनातून करण्यात आल्या. दिवेकरांना त्यांच्या हक्काचे आणि नियमित पाणी मिळावे यासाठी प्रशासनाने तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली. दिवेकरांच्या हक्काच्या पाण्यासाठी हा लढा यापुढेही सुरू राहणार असल्याचा निर्धार नागरिकांनी व्यक्त केला.



संगमनेर तालुक्यात शिवसेनेची ताकद वाढली; असंख्य कार्यकर्त्यांसह दिव्यांग बांधवांचा पक्षप्रवेश

संगमनेर : (स. गांवकरी)

संगमनेर तालुक्यातील बोटा पठार भागातील असंख्य कार्यकर्त्यांसह दिव्यांग बांधवांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. संगमनेर येथील मातोश्री लॉन्स येथे आयोजित या पक्षप्रवेश सोहळ्यात शिवसेना उपजिल्हाप्रमुख रमेश काळे यांच्या नेतृत्वाखाली अनेक कार्यकर्त्यांनी शिवसेनेचा भगवा हाती घेतला. आमदार अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रवेश सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.



शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत नव्या कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला. हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन समाजातील सर्वसामान्य घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच सामाजिक कार्याला गती देण्यासाठी आपण शिवसेनेत सहभागी होत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. पक्षात प्रवेश केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे स्वागत करून त्यांच्या पुढील राजकीय आणि सामाजिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. संगमनेर तालुक्यात शिवसेनेचा जनाधार वाढत असून, सर्वसामान्य नागरिकांसह दिव्यांग बांधवांच्या समस्या सोडविण्यासाठी आणि त्यांना न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी अधिक प्रभावीपणे काम करण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.

संगमनेरच्या विकासाला नवी दिशा देण्यासाठी आणि जनसेवेचे कार्य अधिक व्यापक करण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचे आवाहन करण्यात आले. नव्याने पक्षात सहभागी झालेल्या कार्यकर्त्यांच्या माध्यमातून तालुक्यात शिवसेनेची संघटनात्मक ताकद अधिक मजबूत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

या पक्षप्रवेश सोहळ्यात गणेश शेळके, अरुण काळे, विजू पानसरे, संभाजी काळे, बाबाजी गायकर, संतोष लामखडे, कृष्णा लामखडे, मारुती शेळके, धोंडीभाऊ शेळके, बाळू काळे, बाळशीराम शेळके, राजू कुरकुटे, बारकु कापसे, निलेश शेळके, संतोष पानसरे, सुभाष गावडे, निवृत्ती पोखरकर, सुनीता कुरकुटे, लीलाबाई कनिंगध्वज, शोभा मधे, कुंतल शेळके, ईश्वरी शेळके, आशफाक मोमीन, रिहान शेख यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला.

महादजी शिंदे इंग्लिश मीडियम मध्ये रंगला दांडिया महोत्सव; विद्यार्थ्यांसह पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

येथील रयत शिक्षण संस्थेच्या महादजी शिंदे इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दांडिया महोत्सव उत्साहात संपन्न झाला.विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त सहभाग लाभलेल्या या कार्यक्रमात आकर्षक पारंपरिक वेशभूषा करून दांडियाच्या तालावर थिरकणारी विद्यार्थ्यांची पावले, जल्लोष पूर्ण वातावरण यामुळे विद्यालय परिसर आनंदात रंगून गेला.

कार्यक्रमासाठी गौरी गणेश भोस, महादजी शिंदे विद्यालयाचे प्राचार्य दिलीप भुजबळ, ज्येष्ठ पत्रकार पीटर रणसिंग, डॉ. शुभांगी दरेकर, गंगाराम मचे, सतीश भुजबळ उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक करत सांस्कृतिक उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सांघिक भावना आणि भारतीय संस्कृतीविषयीची आवड वाढीस लागते, असे मत मान्यवरांनी यावेळी व्यक्त केले.



दांडिया महोत्सवास पालकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. उत्कृष्ट जोडी, उत्कृष्ट दांडिया आणि उत्कृष्ट वेशभूषा पुरस्कारांसाठी विद्यालयाच्या वतीने तसेच पालक श्री. कारंजकर यांच्या वतीने सन्मान चिन्ह देण्यात आले.दौंड येथील महालक्ष्मी मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्यावतीने डॉ.शलाका लोणकर-बंगाळे यांनी विद्यालयास वजन काटा भेट दिला. याबरोबरच कार्यक्रमासाठी त्रिमूर्ती भेळचे चंद्रकांत चौधरी, महावीर वस्त्र भांडारचे हर्षद भंडारी, उत्कर्ष इंटरप्राईजेसचे भूषणकुमार नरके, गांधी जम्बो झेरॉक्सचे रोहन गांधी, शिवशाही कलेक्शनच्या रोहिणी बोरुडे, ब्राईट लर्नर अॅकेडमीचे रिजवान हकीम, डॉ. शुभांगी दरेकर, ताहीर तांबोळी यांनी प्रायोजकत्व दिले. विद्यार्थ्यांचे नृत्यकौशल्य, तालबद्ध सादरीकरण, वेशभूषा आणि एकूण सहभाग यांचे विभा गुगळे, कोमल पटेल आणि निर्मला पिपाडा यांनी परीक्षक म्हणून काम पहात कौतुक केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापिका शेख एस.ए. यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालयाच्या डान्स कोरिओग्राफर श्रद्धा कोकणे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

भारतीय संस्कृती व परंपरेचे महत्त्व अधोरेखित करणारा, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा आणि सामाजिक सहकार्याची भावना वृद्धिंगत करणारा हा दांडिया महोत्सव विद्यालयाच्या वतीने आयोजित करण्यात आल्याबद्दल पालकांनी शालेय प्रशासनाचे कौतुक केले.

पदवीधर मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मद्यविक्रीची दुकाने बंद

नांदेड : (स. गांवकरी)

महाराष्ट्र विधानपरिषद औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक अंतर्गत नांदेड जिल्ह्यात मतदान प्रक्रिया सुरळीत, शांततापूर्ण व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील मद्यविक्रीची दुकाने बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानपरिषद औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक-2026 चा कार्यक्रम घोषित केला असून, दि. 23 ऑक्टोबर 2026 रोजी मतदान होणार आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडणे, आदर्श आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करणे, खर्चावर नियंत्रण ठेवणे, मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवणे तसेच सार्वजनिक शांतता अबाधित राखणे या उद्देशाने हा आदेश जारी करण्यात आला आहे. महाराष्ट्र दारूबंदी कायदा तसेच महाराष्ट्र विधानपरिषद निवडणुकीसंदर्भातील निवडणूक आयोगाच्या निर्देशांनुसार नांदेड जिल्ह्यातील मद्यविक्रीची दुकाने दि. 21 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 4 वाजेपासून दि. 23 ऑक्टोबर या कालावधीत मतदान संपण्यापूर्वी 48 तास अगोदर, मतदानाच्या पूर्वीचा दिवस व मतदानाच्या दिवशी बंद ठेवण्यात येणार आहेत. वरील कालावधीत नांदेड जिल्ह्यातील संबंधित मद्यविक्रीची दुकाने बंद ठेवणे बंधनकारक राहील. या आदेशाचे उल्लंघन करून मद्यविक्री सुरू असल्याचे आढळून आल्यास संबंधित अनुज्ञप्ती रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

दसरा : सीमोल्लंघन मनाचेही!

– ह.भ.प. श्री. विशाल रघुनाथ गडगे, आळेफाटा

------ : (स. गांवकरी)

संस्कृतीतील सण हे परंपरा जपण्याचे माध्यम असून जीवनाला नवी दिशा देणारे संस्कार आहेत. विजयादशमी अर्थात दसरा हा त्यांपैकीच एक. या दिवशी आपट्याची पाने सोने म्हणून वाटली जातात, शस्त्रपूजन केले जाते आणि सीमोल्लंघनाची परंपरा जपली जाते. काळ बदलला, जीवनशैली बदलली, तरी या सणाचा मूळ संदेश आजही तितकाच महत्त्वाचा आहे. कारण आज गरज आहे ती केवळ गावाच्या सीमा ओलांडण्याची नव्हे, तर मनाच्या, विचारांच्या आणि कृतीच्या मर्यादा ओलांडण्याची!

प्रभू श्रीरामांचा रावणावरील विजय, देवी दुर्गेने केलेला महिषासुराचा वध आणि पांडवांनी अज्ञातवास संपल्यानंतर पुन्हा धारण केलेली शस्त्रे या पौराणिक कथांमधून अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची, सदाचार जपण्याची आणि कर्तव्यपूर्तीसाठी सज्ज होण्याची प्रेरणा मिळते. रावण विद्वान, पराक्रमी आणि सामर्थ्यवान होता; मात्र अहंकाराने त्याची विवेकबुद्धी झाकोळली. सामर्थ्याचा गैरवापर आणि मर्यादांचे उल्लंघन यांमुळे त्याचा अंत झाला. ज्ञान, सत्ता आणि संपत्ती यांना सदाचाराची जोड नसेल, तर त्यांचा उपयोग टिकाऊ यशासाठी होत नाही, हा या कथेतून मिळणारा बोध आहे. रावणाच्या पुतळ्याचे दहन करण्याबरोबरच मनातील अहंकार, द्वेष आणि अन्यायाची वृत्ती नष्ट करण्याचा संकल्प केला, तर या परंपरेला खरा अर्थ प्राप्त होईल.

देवी दुर्गेने महिषासुराचा केलेला वध हा दुष्ट प्रवृत्तींवरील स्त्रीशक्तीच्या विजयाचे प्रतीक आहे. मात्र, देवीची पूजा करताना प्रत्यक्ष जीवनातील स्त्रीचाही सन्मान राखला पाहिजे. मुलींचे शिक्षण, महिलांची सुरक्षितता, समान संधी आणि स्वावलंबन यांना प्राधान्य देऊन त्यांच्या निर्णयस्वातंत्र्याचा आदर करणे, हीच स्त्रीशक्तीची खरी उपासना ठरेल. त्याचप्रमाणे, पांडवांच्या शस्त्रपूजनातून संकटाच्या काळात संयम राखण्याची आणि योग्य वेळी कर्तव्यपूर्तीसाठी सज्ज होण्याची प्रेरणा मिळते. आज ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि कौशल्य हीच प्रगतीची प्रभावी साधने आहेत. त्यांचा उपयोग समाजहितासाठी करणे, हे आधुनिक काळातील शस्त्रपूजन होय.

दसऱ्याला आपट्याची पाने सोने म्हणून वाटण्याची प्रथा स्नेह, सद्भाव आणि समृद्धीचे प्रतीक आहे. मात्र, पाने देताना मनातील कटुता कायम राहिली, तर परंपरेचा आत्माच हरवतो. गैरसमज दूर करणे, नात्यांमधील दुरावा मिटवणे आणि गरजूंना मदतीचा हात देणे, यातून या सणाचा सामाजिक आशय अधिक व्यापक होईल. माणसांमधील प्रेम, विश्वास आणि आपुलकी हीच खऱ्या अर्थाने जीवनातील समृद्धी आहे.

विजयादशमीशी जोडलेली सीमोल्लंघनाची परंपराही व्यापक अर्थ सांगते. पूर्वी पावसाळा संपल्यानंतर अनुकूल काळात राजे-महाराजे मोहिमांसाठी राज्याच्या सीमा ओलांडत असत. आज संघर्षांचे स्वरूप बदलले असले, तरी जीवनातील आव्हाने कायम आहेत. अपयशाची भीती, समाज काय म्हणेल याची चिंता, जुनाट रूढी आणि चुकीच्या समजुती अनेकांच्या प्रगतीत अडथळे निर्माण करतात. परिस्थितीपेक्षा मानसिकतेच्या बेड्या अधिक घट्ट असतील, तर संधी असूनही माणूस पुढे जाऊ शकत नाही. या अदृश्य मर्यादा ओलांडून नव्या संधींचा स्वीकार करणे, हेच आधुनिक सीमोल्लंघन आहे. आज तंत्रज्ञानामुळे जग जवळ आले आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी जागतिक ज्ञान मिळवू शकतो, तरुण कौशल्यांच्या बळावर नव्या संधी निर्माण करू शकतो आणि महिला विविध क्षेत्रांत कर्तृत्व सिद्ध करू शकतात. तरीही जातिभेद, स्त्री-पुरुष विषमता आणि सामाजिक दबाव अनेकांच्या प्रगतीला खीळ घालतात. शेतकऱ्याने आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे, तरुणांनी कौशल्ये विकसित करणे आणि विद्यार्थ्यांनी पाठांतराच्या पलीकडे जाऊन प्रश्न विचारण्याची सवय लावणे, ही काळाची गरज आहे. परंपरा जपत विवेकाचा आधार घेणे आणि आधुनिकतेचा स्वीकार करताना संस्कारांचे भान राखणे, यातूनच प्रगतीचा मार्ग सुकर होईल.

आज समाजासमोर द्वेषपूर्ण भाषा, जातीय तेढ, भ्रष्टाचार, व्यसनाधीनता आणि समाजमाध्यमांवरील अपप्रचार अशी अनेक आव्हाने आहेत. मतभिन्नता असणे स्वाभाविक आहे; मात्र मतभेदांचे रूपांतर वैरात होणे घातक आहे. जात, धर्म, भाषा किंवा आर्थिक परिस्थितीच्या आधारावर भिंती उभारण्याऐवजी परस्परांचा आदर करायला हवा. काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर या अंतर्गत शत्रूंवर नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. दुसऱ्याच्या यशाचा मत्सर करण्याऐवजी त्यातून प्रेरणा घेणे आणि स्वतःच्या प्रगतीसोबत समाजकल्याणाचाही विचार करणे, हेच मनाचे सीमोल्लंघन ठरेल.

सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांचे शौर्य आपल्याला कर्तव्यनिष्ठेची जाणीव करून देते. त्याच भावनेने प्रत्येकाने आपापली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली पाहिजे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे भविष्य घडवावे, लोकप्रतिनिधींनी जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य द्यावे, कर्मचाऱ्यांनी कर्तव्याशी प्रामाणिक राहावे आणि नागरिकांनी सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करावे. अन्यायाविरुद्ध उभे राहणे, दुर्बलांना आधार देणे आणि सामाजिक सलोखा टिकवणे, हीच आधुनिक काळातील धर्मविजयाची रूपे आहेत.

विजयादशमी आपल्याला विजयाचा उत्सव साजरा करायला शिकवते; पण त्यासाठी संघर्ष स्वीकारण्याचे धैर्यही देते. अडथळ्यांना सामोरे जाताना अपयश येऊ शकते; मात्र त्यातून शिकण्याची तयारी असेल, तर प्रत्येक अपयश पुढील यशाची पायरी ठरू शकते. स्वतःतील दोष ओळखून त्यांत सुधारणा करणे आणि बदलासाठी कृती करणे, हाच आत्मविकासाचा मार्ग आहे. रावणाचे दहन वर्षातून एकदा होते; परंतु मनातील रावणाचा सामना दररोज करावा लागतो.

यंदाच्या दसऱ्याला आपट्याच्या पानांसोबत विचारांची उदारता, व्यवहारातील नम्रता आणि कृतीतील प्रामाणिकपणा जपूया. मनातील भीती, द्वेष आणि संकुचितपणाच्या सीमा ओलांडूया. कारण दुसऱ्याला पराभूत करणे हा विजय असू शकतो; पण स्वतःमधील वाईट प्रवृत्तींवर मात करणे, हाच खरा आत्मविजय आहे. धर्मविजयातून आत्मविजयाकडे नेणारा हाच विजयादशमीचा शाश्वत संदेश आहे.

लोकप्रतिनिधींनी सर्वसामान्यांच्या प्रश्नावर राजकारण करणे दुर्दैवी; सभापती गंगाराम बेलकर

राणीताई लंके यांच्या शुभहस्ते खामकर झाप मार्गे वडगाव सावताळ बसला हिरवा झेंडा

पारनेर : (स. गांवकरी)

लोकप्रतिनिधींनी जनतेच्या मूलभूत समस्या सोडविण्याला प्राधान्य दिले पाहिजे. मात्र, तालुक्यात सामान्य माणसांच्या प्रश्नांवरही राजकारण केले जाते, ही दुर्दैवाची बाब आहे. असे पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर मत व्यक्त केले.

पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथे स्वातंत्र्यानंतर प्रथमच खामकर झाप मार्गे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची एसटी बससेवा सुरू झाली. टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रवींद्र राजदेव यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे या बससेवेला मंजुरी मिळाली. सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता पारनेर आगारात माजी जिल्हा परिषद सदस्या राणीताई निलेश लंके आणि पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बसला हिरवा झेंडा दाखवून सेवेचा शुभारंभ करण्यात आला.



वडगाव सावताळ, खामकर झाप आणि गाजदीपूर परिसरातील ग्रामस्थांकडून अनेक दिवसांपासून एसटी बससेवेची मागणी केली जात होती. या भागातील वाहतुकीची अडचण लक्षात घेऊन राजदेव यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केला. अखेर प्रशासनाने बससेवेला हिरवा कंदील दिला. या निर्णयामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसच्या डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. बाळासाहेब कावरे, राष्ट्रवादीच्या महिला नेत्या सोनिया राजदेव, जिल्हा प्रवक्ते मोहनराव रोकडे, शिक्षक नेते संतोष खामकर, युवा नेते महेंद्र गायकवाड, पारनेर आगार व्यवस्थापक अमोल कोतकर, रवींद्र कुस्कर, बाळासाहेब मते आदी उपस्थित होते.

बससेवा सुरू झाल्यामुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून, दळणवळणाची सुविधा उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणासह दैनंदिन प्रवासाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



अभिनव शिक्षण संकुलात गरबा महोत्सव २०२६ उत्साहात संपन्न!

अकोले (स. गांवकरी) : अभिनव शिक्षण संस्थेच्या वतीने शुक्रवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०२६ रोजी वसुंधरा अकॅडमी स्कूल लॉन, अकोले येथे गरबा महोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाला संस्थेतील शिक्षिका, महिला कर्मचारी, महिला पालकवर्ग तसेच अकोले तालुक्यातील महिलांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. पारंपरिक वेशभूषा, गरब्याचा उत्साह आणि नृत्याच्या तालावर संपूर्ण परिसर आनंदमय वातावरणाने भारावून गेला. या कार्यक्रमाला अभिनव शिक्षण संस्थेच्या कोषाध्यक्ष तथा वसुंधरा अकॅडमीच्या प्राचार्या डॉ. जयश्री देशमुख, उपप्राचार्या राधिका नवले, अभिनव शिक्षण संस्थेच्या वरिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या कुसुम वाकचौरे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या स्मिता पुंड तसेच संस्थेच्या ग्रंथालय विभाग प्रमुख मनीषा आभाळे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या गरबा महोत्सवात महिलांसाठी विविध आकर्षक पारितोषिकांची व्यवस्था करण्यात आली होती. यामध्ये उत्कृष्ट सादरीकरणासाठी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाची तीन पारितोषिके, उत्कृष्ट वेशभूषेसाठी प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाची तीन पारितोषिके, तसेच उत्कृष्ट ड्युएट नृत्यासाठी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक ठेवण्यात आले होते.

दुष्काळी परिस्थितीत विद्यार्थ्यांच्या शुल्कासाठी सक्ती करू नका

नांदेड (स. गांवकरी) : जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी व शेतमजूर कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे शिक्षण अबाधित राहावे आणि आर्थिक अडचणींमुळे त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, यासाठी जिल्ह्यातील सर्व खासगी शिकवणी वर्ग, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रे आणि शैक्षणिक संस्थांनी सामाजिक बांधिलकी जपत सहकार्य करावे. शेतकरी व शेतमजूर कुटुंबांतील विद्यार्थ्यांकडून शुल्क वसुलीसाठी सक्ती करू नये, असे आवाहन जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. दुष्काळी परिस्थितीमुळे आर्थिक अडचणीत असलेल्या कुटुंबांतील विद्यार्थ्यांना शुल्क भरण्यासाठी वारंवार तगादा लावू नये. आर्थिक परिस्थितीमुळे विद्यार्थ्यांना मानसिक त्रास होईल किंवा त्यांच्या शिक्षणात अडथळे निर्माण होतील, असे वर्तन टाळावे. संबंधित विद्यार्थ्यांच्या पालकांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेऊन शुल्क भरण्यासाठी मुदतवाढ देणे, टप्प्याटप्प्याने शुल्क स्वीकारणे तसेच शक्य असेल तेथे शुल्कात सवलत देणे, अशा पर्यायांचा विचार करावा. संकटाच्या काळात विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू राहणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. त्यामुळे खासगी शिकवणी वर्ग, कोचिंग क्लासेस आणि शैक्षणिक संस्थांच्या संचालकांनी सहानुभूतीपूर्वक भूमिका घेऊन आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकरी व शेतमजूर कुटुंबांतील विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा. आर्थिक परिस्थितीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

होरायझन ॲकॅडमीमध्ये नवरात्रोत्सव व दसरा उत्सव उत्साहात साजरा!

मखमलाबाद (स. गांवकरी) : मराठा विद्या प्रसारक समाज, नाशिक संचलित होरायझन ॲकॅडमी, मखमलाबाद येथे नवरात्रोत्सव व दसरा उत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शाळेत विविध सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा आणि मनोरंजनात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्ती, उत्साह आणि आनंदाने भारावून गेला. या उत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे विद्यार्थ्यांनी साकारलेली नवदुर्गेची नऊ रूपे! पारंपरिक वेशभूषेत विद्यार्थ्यांनी देवीच्या नऊ स्वरूपांचे देखणे सादरीकरण केले. या सादरीकरणातून भारतीय संस्कृती, परंपरा आणि स्त्रीशक्तीचा जागर करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध नृत्याविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच पारंपरिक गरबा आणि दांडियाच्या तालावर ठेका धरत विद्यार्थ्यांनी उत्सवाचा मनमुराद आनंद लुटला. नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, धार्मिक परंपरा, सामूहिक सहभाग आणि कलागुणांना वाव देण्याची संधी मिळाली. विविध कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपल्या कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. या कार्यक्रमाच्या व्यासपीठावर मराठा विद्या प्रसारक समाजाचे संचालक रमेश (आबा) पिंगळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकरराव पिंगळे आणि शाळेच्या प्राचार्या श्रीमती भाग्यश्री लाडोळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. मान्यवरांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष शोभा प्राप्त झाली. शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. शिक्षणासोबतच संस्कार, परंपरा, कला आणि सांस्कृतिक मूल्यांची जोपासना करण्याचा होरायझन ॲकॅडमीचा प्रयत्न या उत्सवातून अधोरेखित झाला. भक्ती, संस्कृती आणि कलाविष्कार यांचा सुंदर संगम घडविणारा हा नवरात्रोत्सव व दसरा उत्सव विद्यार्थ्यांसाठी आनंददायी आणि संस्मरणीय ठरला.

"एसजीजीएस आयकॉन्स मीट २०२६" पुणे येथे उत्साहात संपन्न

नांदेड : (स. गांवकरी)

-श्री गुरु गोबिंदसिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र संस्था,नांदेड यांच्या वतीने दि १७ व १८ ऑक्टोबर २०२६ रोजी पुण्यातील लेमन ट्री प्रीमियर हॉटेल येथे ' "एसजीजीएस आयकॉन्स मीट २०२६" या दोन दिवसीय विशेष संमेलनाचे आयोजन करण्यात आले. देश-विदेशातील उद्योग, व्यवसाय, संशोधन, शिक्षण, विज्ञान, प्रशासन आणि कला क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळविलेल्या एसजीजीएस च्या नामवंत माजी विद्यार्थ्यांनी या संमेलनात सहभाग घेतला.

नियामक मंडळाचे अध्यक्ष प्रशांत पौळ यांनी ऑनलाइन प्रणाली द्वारे कार्यक्रमात सहभागी होवून उपस्थिताना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या उद्घाटनप्रसंगी संस्थेचे माजी प्राचार्य प्रा.बी.एम. नाईक,संस्थेच्या नियामक मंडळाचे माजी अध्यक्ष सुनीलजी रायठठ्ठा, संस्थेच्या नियामक मंडळाचे सदस्य व वरिष्ठ आयपीएस अधिकारी डॉ. संजय लाठकर, सुरेशजी जोंधळे, अमोल महामुनी, संस्थेचे संचालक डॉ.मनेश कोकरे आणि कार्यक्रम समन्वयक डॉ.रवींद्र जोशी यांचेसह एसजीजीएस च्या अनेक नामवंत माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

"आयकॉन्स मीट – 2026" या कार्यक्रमासाठी अमेरिकेहून आलेले उद्योजक श्रीकांत निस्ताने, सिंगापूर व इतर देशांतील आंतरराष्ट्रीय कंपन्यांमध्ये वरिष्ठ पदांवर कार्यरत माजी विद्यार्थी विशेष उपस्थित होते. याशिवाय संस्थेचे माजी संचालक डॉ.यशवंत जोशी, डॉ. लक्ष्मण वाघमारे, सीओईपीचे कुलगुरू डॉ.सुनील भिरुड, तसेच उद्योजक व उद्योग क्षेत्रातील मान्यवर अभय देशपांडे, डॉ. राजेश ऊके, बलराम खोत,सतीश पाटील, विकास राठोड, अभिजीत केळकर, हेमंत चाफळे,राजेंद्र गोरे,संजय गाडगे आणि श्रीधर भट यांनी सहभाग घेतला.



शासकीय व प्रशासकीय क्षेत्रातून दिनेश पांगारकर, आयआरएस अधिकारी माधव सुलफुले, कामगार मंत्रालयातील वरिष्ठ अधिकारी डॉ. रवींद्र धुरजड आणि मुख्यमंत्री कार्यालयातील वरिष्ठ अधिकारी सौ. सरोज देशपांडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील अनेक प्रतिष्ठित अधिकारी उपस्थित होते.

दोन दिवसांच्या या संमेलनात उद्योग व उद्योजकता, कॉर्पोरेट लीडरशिप, संशोधन व शिक्षण, तसेच प्रशासकीय सेवा अशा विविध ट्रॅक्समध्ये चर्चा आयोजित करण्यात आल्या. विशेषतः इंटर्नशिप, प्लेसमेंट, स्टार्टअप व इनक्युबेशन, स्कॉलरशिप, रिसर्च कोलॅबोरेशन, सी.एस.आर. आणि इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट या विषयांवर माजी विद्यार्थ्यांच्या सहकार्याच्या संधींवर विचारमंथन करण्यात आले.

संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी ' "एसजीजीएस व्हिजन २०३५" सादर करून संस्थेच्या भविष्यातील शैक्षणिक, संशोधन व पायाभूत विकासाची दिशा स्पष्ट केली. यावेळी माजी विद्यार्थ्यांनी संस्थेच्या प्रगतीसाठी आपले ज्ञान, अनुभव, उद्योगसंपर्क आणि संसाधने उपलब्ध करून देण्याबाबत सकारात्मक भूमिका व्यक्त केली.

कार्यक्रमात मान्यवर एसजीजीएस आयकॉन्स यांचा सन्मान, त्यांच्या यशोगाथांवरील व्हिडिओ प्रेझेंटेशन,पॅनल डिस्कशन, समूहचर्चा, ओपन हाऊस आणि संस्थेसाठी योगदानाच्या संधींवर विशेष सत्रे आयोजित करण्यात आली. उत्कृष्टतेचा दुवा, प्रभावाची निर्मिती, एसजीजीएस नांदेडच्या भविष्याची जडणघडण या संकल्पनेवर आधारित हे संमेलन माजी विद्यार्थी आणि संस्थेमधील संबंध अधिक दृढ करणारे ठरले.

या संमेलनात डॉ. रवींद्र जोशी लिखित "एसजीजीएस आयकॉन्स भाग-३" या पुस्तकाचे प्रा. बी. एम. नाईक यांच्या हस्ते प्रकाशन झाले. या तिसऱ्या भागात ४० यशस्वी माजी विद्यार्थ्यांच्या प्रेरणादायी यशोगाथांचा समावेश असून, आतापर्यंत तीन भागांतून एकूण १०० एसजीजीएस आयकॉन्सचा प्रेरणादायी प्रवास शब्दबद्ध करण्यात आला आहे.

संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी देश-विदेशातून उपस्थित राहिलेल्या सर्व मान्यवर माजी विद्यार्थ्यांचे आभार मानले. संस्थेच्या प्रगतीसाठी माजी विद्यार्थ्यांचे संघटित योगदान महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले.या संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे संचालक, संस्थेच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष व सर्व सदस्य, आयोजन समिती, प्राध्यापक, माजी विद्यार्थी प्रतिनिधी आणि विद्यार्थी स्वयंसेवक यांनी विशेष परिश्रम घेतले.

नवरात्रोत्सवानिमित्त दांडिया आणि गरब्याचा ठेका रंगला!

भिवंडी : (स. गांवकरी)

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून भिवंडी तालुक्यातील पडघे परिसरात गरबा आणि दांडियाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. संगीताचा ठेका, पारंपरिक वेशभूषा आणि गरब्याच्या तालावर फेर धरून नृत्य करणाऱ्या तरुणाईमुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळांच्या वतीने गरबा आणि दांडिया कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, नवतरुणांसह नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळत आहे. ओम श्री साईनाथ सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळ, पडघे यांच्या वतीने आयोजित दांडिया कार्यक्रमाला तरुणाईचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. मंडळाने जपलेली ही ३० वर्षांची परंपरा परिसरातील सांस्कृतिक उत्सवाचे आकर्षण ठरत आहे. संगीताच्या तालावर दांडिया खेळणाऱ्या तरुणाईमुळे कार्यक्रमात चांगलीच रंगत निर्माण झाली आहे. नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून



धार्मिक परंपरा जपण्यासोबतच सामाजिक एकोपा आणि सांस्कृतिक वारसा वृद्धिंगत होत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

दरम्यान, महाजनवाडी हॉल येथे गुजराती नवरात्री उत्सव मंडळ, पडघा यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या गरबा उत्सवातही मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. या ठिकाणी गुजराती संस्कृतीची परंपरा जपत दोन टाळी, तीन टाळी, दांडिया गरबा तसेच पारंपरिक गरब्याचे विविध प्रकार खेळले जात आहेत. पारंपरिक पद्धतीने फेर धरून गरबा खेळण्याच्या या उपक्रमामुळे उत्सवाला विशेष रंगत आली आहे. संगीताच्या तालावर एकसुरात आणि उत्साहाने गरबा खेळणाऱ्या सहभागींचे वातावरण लक्षवेधी ठरत आहे. याशिवाय, सुदर्शन मित्र मंडळ, पडघे; नवदुर्गा मित्र मंडळ, पंचशीलनगर; शिवछत्रपती मित्र मंडळ, दीनदयाळ नगर, पडघे; तसेच आई तुळजा भवानी मित्र मंडळ, न्यू बालाजी नगर पडघा, आई एकविरा मित्र मंडळ बालाजी नगर ,जय दुर्गा मित्र मंडल शाहू नगर येथील मंडळांच्या वतीनेही दांडिया कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे पडघे परिसरातील विविध भागांत नवरात्रोत्सवाची धूम पाहायला मिळत आहे. नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने एकत्र येणारी तरुणाई, पारंपरिक नृत्यप्रकारांचे जतन आणि नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे पडघे परिसरातील नवरात्रोत्सवाला विशेष रंगत आली आहे. विविध मंडळांच्या या सांस्कृतिक उपक्रमांमुळे परिसरात भक्तिमय आणि उत्साही वातावरण निर्माण झाले आहे.

तात्पुरत्या फटाका परवान्यांसाठी अर्ज स्वीकारण्यास 27 ऑक्टोबरपर्यंत मुदतवाढ

नांदेड : (स. गांवकरी)

दीपावली उत्सवाच्या पार्श्वभूमीवर तात्पुरत्या फटाका स्टॉलसाठी परवाना घेऊ इच्छिणाऱ्या अर्जदारांना अर्ज सादर करण्यासाठी दि. 27 ऑक्टोबर 2026 पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. यापूर्वी जाहीर करण्यात आलेल्या अर्ज विक्री व स्वीकृतीच्या कालावधीत अंशतः बदल करण्यात आला असून, उर्वरित अटी व शर्ती कायम राहणार आहेत, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी, नांदेड यांनी दिली आहे.

वर्ष 2026 मध्ये दीपावली उत्सव दि. 5 नोव्हेंबर ते 11 नोव्हेंबर 2026 या कालावधीत साजरा होत आहे. त्यानुषंगाने नांदेड महानगरपालिका हद्दीतील तात्पुरत्या फटाका स्टॉलसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ताब्यातील अधिग्रहीत जमीन, प्रचलित नाव मोदी मैदान, मामा चौकाजवळ, असर्जन, नांदेड येथे परवानगी देण्यात येणार आहे.

नांदेड महानगरपालिका हद्दीतील तात्पुरत्या फटाका परवान्यासाठीचे अर्ज सेतू समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांच्यामार्फत, तर जिल्ह्यातील इतर भागांसाठी संबंधित उपविभागीय कार्यालयामार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील तात्पुरत्या फटाका स्टॉलसाठी अर्ज विक्री व स्वीकृती करण्यात येणार आहे.

विस्फोटक अधिनियम, 2008 मधील तरतुदीनुसार तात्पुरत्या फटाका परवान्यासाठी अर्ज सादर करण्याची मुदत दि. 27 ऑक्टोबर 2026 पर्यंत वाढविण्यात आली आहे. यापूर्वी प्रसिद्ध करण्यात आलेल्या जाहीर प्रगटनातील इतर सर्व अटी व शर्ती कायम राहतील. तसेच, विनापरवाना फटाक्यांची विक्री करताना कोणी आढळून आल्यास संबंधितांविरुद्ध फौजदारी कार्यवाही करण्यात येईल, असा इशारा प्रशासनाने दिला आहे.

तात्पुरत्या फटाका स्टॉलसाठी परवाना घेऊ इच्छिणाऱ्या संबंधितांनी विहित मुदतीत अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

इंग्रजीची भीती दूर करून आत्मविश्वास वाढविण्यासाठी 'प्रवक्ता अकॅडमी'चा अभिनव उपक्रम!

श्रीगोंद्यात स्पोकन इंग्लिश अकॅडमीचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन; विद्यार्थ्यांसाठी एआय लॅबसह आधुनिक शिक्षणाची सुविधा

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

इंग्रजी भाषा ही आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षण, रोजगार आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वाची ठरत आहे. विद्यार्थ्यांसह सर्व वयोगटांतील नागरिकांना इंग्रजी भाषेत आत्मविश्वासाने संवाद साधता यावा, या उद्देशाने श्रीगोंदा येथे सुरू करण्यात आलेल्या 'प्रवक्ता स्पोकन इंग्लिश अकॅडमी'चे उद्घाटन रविवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी प्रवक्ता अकॅडमीचे अध्यक्ष रवींद्र पाटील, माजी मंत्री तथा आमदार बबनरावजी पाचपुते आणि श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडले.

या उद्घाटन सोहळ्यास श्रीगोंदा नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा अलकाताई दरेकर-अनभुले, श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुभाष काका शिंदे (मढेवडगाव), श्रीगोंदा नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ९ चे नगरसेवक प्रशांत गोरे, प्रवक्ता अकॅडमीचे पश्चिम महाराष्ट्र विभागप्रमुख सागर वाघ-पाटील, अकॅडमीच्या संचालिका निकिता वाघ-पाटील, सोनवणे गांधी पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य अमोल नागवडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय भाषणात प्रवक्ता अकॅडमीचे



अध्यक्ष रवींद्र पाटील यांनी श्रीगोंदा शाखेतील आधुनिक शैक्षणिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या इंग्रजी संभाषण कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले.

यावेळी आमदार बबनरावजी पाचपुते, कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे, संचालक सुभाष काका शिंदे, उपनगराध्यक्षा अलकाताई दरेकर-अनभुले, नगरसेवक प्रशांत गोरे, पश्चिम महाराष्ट्र विभागप्रमुख सागर वाघ-पाटील आणि संचालिका निकिता वाघ-पाटील यांनी मनोगत व्यक्त करून अकॅडमीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्रवक्ता अकॅडमीच्या माध्यमातून इंग्रजी संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी विविध अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जाणार आहेत. विशेष म्हणजे, या अभ्यासक्रमांसाठी वयाची कोणतीही अट नसल्याने विद्यार्थी, तरुण, नोकरदार तसेच इंग्रजी बोलण्याची इच्छा असलेल्या सर्वांना या सुविधेचा लाभ घेता येणार आहे.

अकॅडमीमध्ये अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानावर आधारित लॅबची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शनासोबतच सहविद्यार्थ्यांशी इंग्रजीत संवाद साधणे, समूहचर्चा (ग्रुप डिस्कशन) आणि विविध संवादात्मक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नियमित सरावाची संधी दिली जाणार आहे. त्यामुळे केवळ इंग्रजीचे ज्ञान मिळविण्यापुरते मर्यादित न राहता, प्रत्यक्ष संभाषण करताना आत्मविश्वास वाढविण्यावर भर दिला जाणार आहे.

अकॅडमीच्या उद्घाटनानिमित्त बुधवार आणि गुरुवार या दोन दिवशी विद्यार्थ्यांसाठी मोफत डेमो क्लासचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीगोंदा शहरासह परिसरातील विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अकॅडमीच्या वतीने करण्यात आले आहे.

या उद्घाटन सोहळ्यास श्रीगोंदा शहरातील ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वापे येथे विक्रेत्यांचा श्रमदानातून वनराई बंधारा

भिवंडी : (स. गांवकरी)

बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर शेतीसाठी पाण्याची उपलब्धता वाढविण्याच्या उद्देशाने भिवंडी तालुक्यातील आदिवासीबहुल वापे गावात वनराई बंधाऱ्याची उभारणी करण्यात आली. कृषी विभागाचे अधिकारी, कृषी निविष्ठा विक्रेते आणि स्थानिक शेतकरी गटांनी एकत्र येत श्रमदानातून जलसंधारणाचा हा उपक्रम राबविला. आगामी रब्बी हंगामात भाजीपाला लागवडीसाठी पाण्याचा उपयोग व्हावा, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू आहे.



यंदाच्या खरीप हंगामात प्रतिकूल हवामानामुळे भातपिकाला फटका बसल्याने शेतकरी आर्थिक अडचणींचा सामना करीत आहेत. त्यातच अल निनोच्या संभाव्य परिणामांमुळे पाणीटंचाईची चिंता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत पावसाचे उपलब्ध पाणी अडवून त्याचा शेतीसाठी उपयोग करणे महत्त्वाचे ठरत आहे. याच विचारातून वापे येथे वनराई बंधारा उभारण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला.

भिवंडी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, गुण नियंत्रण शाखा, ठाणे जिल्हा ॲग्रो डीलर वेल्फेअर असोसिएशन आणि तालुक्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला. ठाणे जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी रामेश्वर पाचे यांनी उपस्थित राहून प्रत्यक्ष श्रमदान केले. वनराई बंधाऱ्यांमुळे उपलब्ध पाण्याचा शेतीसाठी उपयोग करून घेण्यास मदत होऊ शकते, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या उपक्रमात भिवंडीचे तालुका कृषी अधिकारी डी. सी. शिंदे, गुण नियंत्रण निरीक्षक विवेक के. दोंदे, उपकृषी अधिकारी बी. जी. गायकवाड, सहायक कृषी अधिकारी टी. एस. राऊत, एच. डी. पाटील, डी. एम. गावंडा आणि एन. के. बुजर यांनी सहभाग घेतला.



कोपरखेरने शंकर महादेव आपारमेंट नवरात्री उत्सव भक्तिमय भजन महाप्रसाद व भाविकांची प्रचंड गर्दी.

थोडक्यात बातम्या...

काँग्रेसच्या मत वाचवा-देश वाचवा अभियानाचा सिडकोतून शुभारंभ

नांदेड (स. गांवकरी) : निवडणूक प्रक्रियेतील गैरप्रकार जनतेपुढे आणण्यासाठी खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस च्या वतीने मत वाचवा देश वाचवा या व्यापक जनसंपर्क अभियानाचा शुभारंभ महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सहप्रभारी रेहना चिश्ती यांच्या हस्ते व डॉ. स्मिता शहापूरे, जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगर जिल्हाध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या विशेष उपस्थितीत सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांच्या नियोजनात हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे दि १९ ऑक्टोंबर रोजी करण्यात आला होता. निवडणूक प्रक्रियेतील गैरप्रकारानंतर मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजिनाम्यासह एसआयआर मोहीमेतील त्रुटीविरोधात काँग्रेस चे विरोधी पक्षनेते खा. राहूल गांधी यांच्या नेतृत्वात काँग्रेसकडून दिल्ली ते गल्ली पर्यंत रस्त्यावरचा लढा अधिक तिव्र करण्यात आला आहे. दरम्यान निवडणूक प्रक्रियेतील गैरप्रकार जनतेपुढे आणण्यासाठी काँग्रेस च्या वतीने मत वाचवा देश वाचवा या व्यापक जनसंपर्क अभियानाचे आयोजन करण्यात आले होते या वेळी खा. रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सहप्रभारी रेहना चिश्ती यांच्या हस्ते व डॉ. स्मिता शहापूरे, जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या विशेष उपस्थितीत, सिडको वाघाळा ब्लॉक काँग्रेस कमिटी अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांच्या नियोजनात या अभियानाचा शुभारंभ सोमवार दि १९ रोजी हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे करण्यात आला आहे. यावेळी मत वाचवा देश वाचवा या जनसंपर्क अभियानाच्या माहिती पत्रकाचे अनावरण करत व्यापारी वर्गात वाटण्यात आले.

गरुडाप्रमाणे पंखांत बळ अन् मनात ध्येय बाळगा : कुलगुरू डॉ. चासकर

नांदेड (स. गांवकरी) : गरुडाच्या पंखांत अफाट सामर्थ्य असते. आकाशात सर्वाधिक उंच भरारी घेणारा गरुड वादळ आणि संकटांनाही न डगमगता सामोरा जातो. संकटांवर मात करत तो आपली भरारी कायम ठेवतो. विद्यार्थ्यांनीही गरुडाप्रमाणे पंखांत बळ, मनात जिद्द आणि डोळ्यांसमोर निश्चित ध्येय ठेवून यशाची उंच भरारी घ्यावी. जीवनातील संकटांना घाबरून न जाता धैर्याने त्यांचा सामना करावा. प्रत्येकाने आपल्यातील सुप्त कलागुणांना वाव देत ध्येयप्राप्तीसाठी सातत्याने प्रयत्नशील राहावे, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि नांदेड एज्युकेशन सोसायटीचे सायन्स कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ज्ञानतीर्थ २०२६' आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाचा समारोप व पारितोषिक वितरण सोहळा सोमवारी दि. १९ महात्मा फुले नगरीतील साने गुरुजी मुख्य मंचावर उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या समारंभाच्या अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. चासकर बोलत होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हाधिकारी डॉ. राहुल कर्डिले, पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन आणि विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन उपस्थित होते. पुढे कुलगुरू डॉ. चासकर म्हणाले की, निरोगी शरीर आणि सुदृढ मन ही यशस्वी जीवनाची खरी ताकद आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आरोग्याकडे विशेष लक्ष देऊन सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहावे. विद्यार्थ्यांच्या सुप्त प्रतिभेला योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांनी आपल्या परिसरात नियमितपणे सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करावे. यावेळी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी विद्यार्थ्यांना वाढत्या सायबर गुन्ह्यांविषयी मार्गदर्शन करत डिजिटल युगातील संभाव्य धोक्यांपासून सावध राहण्याचे आवाहन केले. सध्याच्या तंत्रज्ञानप्रधान युगात सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. मात्र, त्याचा वापर करताना प्रत्येकाने विशेष खबरदारी घेणे गरजेचे आहे. सोशल मीडियावर स्वतःची छायाचित्रे, वैयक्तिक माहिती आणि बायोमेट्रिक तपशील शेअर करताना सतर्कता बाळगावी. कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अशा माहितीचा गैरवापर होण्याची शक्यता असल्याने विद्यार्थ्यांनी डिजिटल सुरक्षेबाबत जागरूक राहावे, असे त्यांनी सांगितले.

भौतिक सुविधा असूनही समाधानाचा अभाव; संत जनाबाईंच्या जीवनातून भक्तीचा संदेश

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

जीवनात अनेक समस्या असतानाही देवाच्या भक्तीतून समाधानी जीवन जगता येते, हे संत जनाबाई यांनी आपल्या कृतीतून दाखवून दिले. आज माणसाकडे भौतिक सुखसुविधा भरपूर आहेत; मात्र मनःशांती आणि समाधानाचा अभाव जाणवतो. संतांनी आपल्या आचरणातून भक्तिमार्गाची शिकवण देत समाधानी जीवन जगण्याची गुरुकिल्ली समाजाला दिली, असे प्रतिपादन ह.भ.प. गोरक्षनाथ महाराज दुतारे यांनी केले.



श्रीगोंदा तालुक्यातील मांडवगण येथील माता जगदंबा देवस्थान, पाउतका येथे शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त आयोजित संतकथा कार्यक्रमात ते बोलत होते.

संत जनाबाई यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकताना ह.भ.प. दुतारे म्हणाले की, आई-वडिलांच्या निधनानंतर संत जनाबाई लहान वयातच संत नामदेव महाराज यांच्या घरी वाढल्या. त्यांनी जात्यावर दळण दळताना ओव्या रचून पांडुरंगाची भक्ती केली. त्यांच्या या निस्सीम भक्तीमुळे प्रत्यक्ष पांडुरंगालाही जनाबाईंसोबत दळण दळण्यात सहभागी व्हावे लागले, अशी संतचरित्रातील भावस्पर्शी कथा आहे. संत जनाबाईंच्या जीवनातून भक्ती, समर्पण आणि श्रद्धेचे महत्त्व अधोरेखित होते. संतांनी केवळ उपदेश केला नाही, तर आपल्या कृतीतून आणि आचरणातून जीवन कसे जगावे, याचा आदर्श समाजासमोर ठेवला, असेही त्यांनी सांगितले.

मांडवगण येथील रहिवासी तथा वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेट सोसायटीचे संस्थापक विठ्ठलराव वाडगे यांच्या पुढाकारातून माता जगदंबा देवस्थानात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त सलग आठ दिवस संतकथा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत संत नामदेव महाराज, संत ज्ञानेश्वर माऊली, संत कैकाडी बाबा, संत मीराबाई, संत सावता महाराज, संत गोरोबा काका, संत जनाबाई आणि संत तुकाराम महाराज यांच्या जीवनचरित्रांवर आधारित कथांचे निरूपण करण्यात आले. शारदीय नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने वृद्धेश्वर अर्बन मल्टिस्टेट सोसायटीच्या चेअरमन सौ. सायली वाडगे आणि सौ. मेघना गावडे यांच्या पुढाकारातून महिला सक्षमीकरण तसेच आरोग्यविषयक जनजागृतीसाठी आरोग्य शिबिर आणि प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांनाही नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याचे त्यांनी सांगितले.

लवकरच सर्व शेतकऱ्यांच्या ई-पीक पाहणी नोंदी पूर्ण होतील – तहसीलदार

तामसा : (स. गांवकरी)



हदगाव तालुक्यातील ई-पीक पाहणी नोंदींच्या अभावामुळे कोणताही शेतकरी ई -पिक पाहणी पासुन वंचित राहणार नाही, अशी ग्वाही तहसीलदार सय्यद उमर यांनी दिली आहे. ई-पीक पाहणी नोंदींच्या संदर्भात तांत्रिक अडचणी सोडविण्याच्या बाबतीत वरिष्ठ कार्यालयास सातत्याने पाठपुरावा सुरू असून,समस्याचे निराकरण होईल व लवकरच सर्व शेतकऱ्यांच्या ई -पिक पाहणीच्या नोंदी पूर्ण होतील, असे त्यांनी स्पष्ट केले.आतापर्यंत तालुक्यात ई -पिक पाहणीचे काम 73% पुर्ण झाले आहे.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ, पीक नुकसान भरपाई तसेच इतर शेतकरी मदतीच्या अनुषंगाने या नोंदी महत्त्वाच्या असल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. मात्र, शेतकऱ्यांनी घाबरून जाण्याची गरज नसून, प्रशासन या अडचणी व समस्याचे निराकरण वेळोवेळी करील ई-पीक पाहणी नोंदींबाबत सोशल मीडियावर किंवा इतर माध्यमांतून पसरवल्या जाणाऱ्या अपुऱ्या व दिशाभूल करणाऱ्या माहितीवर शेतकऱ्यांनी विश्वास ठेवू नये. कोणत्याही अफवांना बळी न पडता अधिकृत माहितीवरच विश्वास ठेवावा, असे आवाहन तहसीलदार सय्यद उमर यांनी केले आहे. शेतकऱ्यांच्या हिताला प्राधान्य देत ई-पीक पाहणी नोंदी बाबतच्या अडचणी वरिष्ठ कार्यालयास पाठपुरावा करून सोडविण्यात येतील.

कल्याण उत्सवमध्ये बालाजी लक्ष्मी पदमवाती विवाह सोहळा उत्साहात

नवीन नांदेड : (स. गांवकरी)

हडको येथील श्रीबालाजी मंदिर देवस्थान आनंद सागर हौसिंग सोसायटी येथे नवरात्र महोत्सव निमित्ताने आयोजित 18 ऑक्टोबर रोजी सायंकाळी 8 वाजता कल्याण उत्सव प्रमुख यजमान यांच्या उपस्थितीत पदमवाती लक्ष्मी बालाजी विवाह विधीवत आचार्य तत्वाने फटाक्यांची आतिषबाजी,ढोलताशांच्या गजरात हजारो भाविक भक्तांचा उपस्थित संपन्न झाला.

दरवर्षी प्रमाणे याही वर्षी, ब्रह्मोत्सवा निमित्य 18 ऑक्टोबर रोजी हडको येथील श्री बालाजी मंदिरात आचार्य पंडिताचा मार्गदर्शनाखाली पुरोहित सतिश गुरू पोतदार, इंद्रमणी दुबे, यांच्या मंत्रोच्चारात मुख्ययजमान प्रकाशसिंह परदेशी, अशोक जाधव यांच्या उपस्थितीत बालाजी लक्ष्मी पद्मावती कल्याण उत्सव सोहळा आयोजित करण्यात आला होता, तर सिडको येथील भगवान बालाजी मंदिरात आचार्य पंडित श्रीमान पवनकुमार यज्ञाचार्य व मंदिर पुजारी व्दियांशु महाराज यांच्या आचार्य तत्वाने मुख्य यजमान साहेबराव जाधव, डॉ.नरेश रायेवार, भगवान नवगिरे व अन्य सहा यजमान यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

यावेळी परिसरातील हजारो महिला भाविक जेष्ठ नागरिक युवक यांच्या उपस्थितीत हा विवाह सोहळा थाटामाटात करण्यात आला यावेळी पाच मंगल अष्टक, नंतर आरती व फटाक्यांची आतिषबाजी, ढोलताशाचा गजरात हा सोहळा संपन्न झाला, यावेळी सामाजीक, राजकीय व पत्रकार यांच्या सह भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते, विवाह सोहळयासठी विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष अरुण दमकोडंवार, उपाध्यक्ष प्रकाशसिंह परदेशी,सचिव माणिकराव देशमुख, कोषाध्यक्ष चंद्रशेखर चव्हाण सहसचिव बालकृष्ण येरगेवार, संस्थापक करणसिंग ठाकूर, संतोष वर्मा अजय भंडारी, विवेकानंद देशमुख, सचिन नपाते, सुभाष कारंजकर किशोर देशमुख सतिश मोरे, तर सिडको भगवान बालाजी मंदिर येथील विश्वस्त मंडळ साहेबराव जाधव, सचिव व्यंकटराव हाडोळे, बाबुराव बिरादार,आनंद बासटवार, डॉ.नरेश रायेवार व विश्वस्त यांनी सहकार्य केले.

लोकशाही पत्रकार महासंघाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी किशोर पवार यांची सर्वानुमते निवड

सोलापूर : (स. गांवकरी)

लोकशाही पत्रकार महासंघ, भारताच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी मा. श्री. किशोर दादा पवार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. महासंघाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या मान्यतेने राष्ट्रीय निवड समिती तसेच महाराष्ट्र प्रदेश कोर कमिटीने त्यांच्या नावाला संयुक्तपणे एकमताने मंजुरी दिली. या निवडीमुळे महाराष्ट्रातील पत्रकारांचे प्रश्न प्रभावीपणे मांडणे, पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी संघटित लढा उभारणे आणि राज्यभर महासंघाचे मजबूत संघटनात्मक जाळे निर्माण करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी किशोर दादा पवार यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. या निवडीकडे केवळ एका पदावरील नियुक्ती म्हणून नव्हे, तर महाराष्ट्रातील पत्रकारांच्या प्रश्नांना संघटित व्यासपीठ मिळवून देण्याच्या दिशेने टाकलेले महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पाहिले जात आहे.



या निवड प्रक्रियेत लोकशाही पत्रकार महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष संदीप जाधव, राष्ट्रीय कार्यकारिणीचे प्रमुख सदस्य तथा मुंबईचे निवृत्त न्यायाधीश डॉ. संतोषकुमार जयस्वाल, राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रतापराव साळुंखे, राष्ट्रीय महामंत्री टी. माधव, राष्ट्रीय संघटनमंत्री ज्ञानेश्वरजी बुधवंत, राष्ट्रीय कायदेशीर सल्लागार तथा मुंबई उच्च न्यायालयाचे वकील रमाकांत पाटील, तसेच महाराष्ट्र प्रदेश कोर कमिटीचे सदस्य डॉ. अनिलजी पाटील, सनम पाटील,शेखर पाटील साहेब, हलीमाताई शेख, पंचशीला कांबळे आणि रेणुका ताई जयस्वाल यांनी किशोर दादा पवार यांच्या नावाला सर्वानुमते मंजुरी दिली. त्यानंतर त्यांच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदावरील निवडीची घोषणा करण्यात आली.

किशोर दादा पवार गेल्या सहा ते सात वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात सक्रिय असून, जनहिताचे प्रश्न, सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या, ग्रामीण भागातील अडचणी, सामाजिक विषय तसेच शासन-प्रशासनाशी संबंधित प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील विविध घटकांच्या समस्या समजून घेणे, त्यांना योग्य व्यासपीठ मिळवून देणे आणि संबंधित यंत्रणांपर्यंत त्यांचा आवाज पोहोचविणे, या दिशेने त्यांनी काम केले आहे.

किशोर दादा पवार हे सेवा सोशल वेल्फेअर ग्लोबल फाउंडेशनचे संस्थापक-अध्यक्ष असून त्यांना लोकांशी संपर्क, प्रश्नांचे संकलन आणि पाठपुराव्याचा मोठा अनुभव आहे. महिला सक्षमीकरण, रोजगाराभिमुख प्रशिक्षण आणि शासकीय योजनांची माहिती गरजूंपर्यंत पोहोचवणे या क्षेत्रात त्यांचे सामाजिक कार्य सुरू आहे.

"जागृती'च्या ज्योतीत निरंकारी संत समागमाच्या तयारीला अंतिम रूप

पुणे : (स. गांवकरी)

जिथे ब्रह्मज्ञानामुळे चेतना जागृत होते, प्रेमामुळे हृदय प्रकाशमान होते आणि सेवा हा जीवनाचा संकल्प बनतो, तिथे संत समागम हा आत्मिक जागृतीचा असा पवित्र उत्सव बनतो, जो मनुष्याला स्वतःच्या अंतरंगात डोकावून पाहण्याची आणि परमात्म्याशी जोडले जाण्याची प्रेरणा देतो.

याच दिव्य भावना आणि आध्यात्मिक चेतनेला साकार करत, सदगुरू माता सुदीक्षा जी महाराज आणि निरंकारी राजपिता रमित जी यांच्या पावन छत्रछायेखाली ७९वा वार्षिक निरंकारी संत समागम २३ ते २६ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा येथे आयोजित करण्यात येत आहे. देश-विदेशातून हजारो श्रद्धाळू या विशाल संत समागमामध्ये एकत्र येऊन सत्संग, सेवा, प्रेम आणि भक्तीच्या या दिव्य मिलनात सहभागी होणार आहेत. पुणे जिल्ह्यातून हजारो च्या संख्येने भक्त भाविक सहभागी होणार आहेत.

श्रद्धाळूंच्या वाढत्या सहभागासोबतच समागम स्थळावरील तयारी आता अंतिम टप्प्यात पोहोचली आहे. संतांच्या निःस्वार्थ सेवा, अथक परिश्रम आणि समर्पणामुळे साधारण भासणारे हे मैदान आज एका दिव्य आध्यात्मिक नगरीचे स्वरूप धारण करत आहे. विशाल पंडालांमध्ये श्रद्धाळूंसाठी सुव्यवस्थित व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच अत्याधुनिक एल.ई.डी. स्क्रीन बसविण्यात येत आहेत, ज्यामुळे परिसरातील प्रत्येक कोपऱ्यात बसलेल्या श्रद्धाळूंना प्रेरणादायी प्रवचने, भावपूर्ण भजने आणि आध्यात्मिक विचार सहजपणे पाहता व ऐकता येतील आणि ते सत्संगाच्या आध्यात्मिक प्रवाहाशी एकरूप होऊ शकतील.

हा संत समागम केवळ एक वार्षिक कार्यक्रम नसून ब्रह्मज्ञान, भक्ती, समर्पण आणि आत्मिक जागृतीचा पवित्र संगम आहे. येथे श्रद्धाळूंना आपल्या अंतःचेतनेला जागृत करण्याची, परमात्म्याशी आत्म्याचे असलेले नाते अनुभवण्याची तसेच विश्वबंधुत्व, सौहार्द आणि निःस्वार्थ सेवा यांसारख्या मानवी मूल्यांना आपल्या जीवनात आत्मसात करण्याची प्रेरणा मिळते. संत समागमाची हीच भावना मनुष्याला बाह्य यश-उपलब्धींच्या पलीकडे जाऊन आपल्या अंतर्मनातील समृद्धी ओळखण्याची संधी प्रदान करते.



समागमाच्या भव्यतेमध्ये श्रद्धाळू भक्तांनी साकारलेले मुख्य स्वागत द्वार विशेष आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. आपल्या अनुपम कलात्मकतेसह भव्य स्वरूपामुळे हे प्रवेशद्वार समागमाच्या आध्यात्मिक गरिमेचे दर्शन घडवते. हे केवळ स्वागतासाठी उभारलेले प्रवेशद्वार नसून सेवा, समर्पण, सृजनशीलता आणि सामूहिक श्रद्धेची साकार अभिव्यक्ती आहे. श्रद्धाळूंच्या वाढत्या सहभागासोबतच त्याचे स्वरूपही सातत्याने अधिक विस्तार आणि भव्यता प्राप्त करत आहे. त्याची दिव्य आभा जणू प्रत्येक आगंतुकाचे प्रेम, आपलेपणा आणि समभावाने हार्दिक स्वागत करत असून संत समागमाच्या मानवी संदेशाचे दर्शन घडवत आहे.

संत निरंकारी मंडळाचे सचिव श्री. जोगिंदर सुखीजा जी यांनी माहिती देताना सांगितले की, सतगुरु माताजींच्या दिव्य प्रेरणा आणि आशीर्वादाने समागमाच्या सर्व व्यवस्था सुव्यवस्थितपणे पुढे सुरू आहेत. समागमाचे सुरळीत संचालन, सहज आवागमन आणि श्रद्धाळूंना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने संपूर्ण परिसराचे चार प्रमुख क्षेत्रांमध्ये विभाजन करण्यात आले आहे. संतांची कर्मठ आणि निःस्वार्थ सेवा भावना या स्थळाला एका भव्य, सुंदर आणि सुव्यवस्थित आध्यात्मिक नगरीचे स्वरूप प्रदान करत आहे. येथे पोहोचताच श्रद्धाळूंना सेवा, समर्पण आणि आध्यात्मिक वातावरणाची दिव्य अनुभूती होत आहे. ७९वा वार्षिक निरंकारी संत समागम हा प्रेम, भक्ती आणि आत्मिक जागृतीच्या त्या पवित्र प्रवाहाशी जोडले जाण्याची एक अनमोल संधी आहे, जो जीवनाला अंतःकरणातून प्रकाशित होण्याची प्रेरणा देतो. या दिव्य आध्यात्मिक मिलनात सर्व संत महात्मा आणि श्रद्धाळू भक्तांचे मनःपूर्वक स्वागत आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ३८ए, सोमेश्वर अपार्टमेंट, अदाते/शिंदे हॉस्पिटलजवळ, पुरूषोत्तम व्हिला समोर, वडगांव बुद्रुक, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)
कोकण विभागीय कार्यालय : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र, २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९

नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 । पाने : ५ । वर्ष : ४ थे । अंक : ३०५ । किंमत : ४ रूपये
Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com



महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी
संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026



मंगळवार दि. २० ऑक्टोंबर २०२६
मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना मदतीचे आवाहन

मुंबई (समर्थ गांवकरी)

राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने यंदाचा दसरा मेळावा संकटग्रस्त शेतकऱ्यांना समर्पित करण्याचा निर्णय घेतला आहे. गोरेगाव येथील नेस्को सेंटर येथे मंगळवारी संध्याकाळी ५ वाजता होणाऱ्या या मेळाव्याला मुंबई आणि आसपासच्या जिल्ह्यातील शिवसैनिक व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन पक्षाकडून करण्यात आले आहे. मात्र, दुष्काळग्रस्त भागातील शिवसैनिक आणि पदाधिकाऱ्यांनी मुंबईत येण्याऐवजी थेट शेतकऱ्यांच्या घरी जाऊन मदतीचे तोरण लावावे, अशी विशेष सूचना पक्षाने दिली आहे. गोरेगावच्या नेस्कोमधील दसऱ्या मेळाव्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. दुष्काळाचे संकट पाहता यंदा कोणतीही सांस्कृतिक कार्यक्रम होणार नसून, थेट शिवसेना नेत्यांच्या भाषणाने मेळाव्याची सुरुवात होईल. या मेळाव्यात शिवसेनेचे मुख्य नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय भूमिका मांडणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

शेतकऱ्यांना दिवाळीचा शिधा आणि मदत

संकटात सापडलेल्या शेतकरी कुटुंबांच्या पाठीशी शिवसेना ठाम पणे उभी असून, त्यांना या कठीण परिस्थितीतून सावरण्यासाठी सर्वतोपरी मदत करण्याचा निर्धार पक्षाने केला आहे. या मेळाव्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांसाठी दिवाळीचा शिधा घेऊन जाणारे ट्रक राज्यातील विविध भागांसाठी रवाना केले जातील. तसेच, शेतकऱ्यांच्या मदतीसाठी उपमुख्यमंत्री शिंदे शिवसैनिकांना एक राज्यव्यापी कार्यक्रम देणार आहेत.



महिला सक्षमीकरण आणि मुलींच्या विवाहासाठी मदत

दुष्काळग्रस्त शेतकरी कुटुंबांतील महिलांना उदरनिर्वाहाचे साधन उपलब्ध व्हावे, यासाठी त्यांना शिलाई म शीनचे वाटप केले जात आहे. तसेच, दुष्काळग्रस्त भागांतील शेतकऱ्यांच्या मुलींच्या विवाहासाठीही शिवसेनेच्या वतीने आर्थिक मदत केली जाणार आहे. शेतकऱ्यांना मदतीचा हात देण्याच्या या घोषणेनंतर स्थानिक नगरसेवक, पदाधिकारी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी मोठा पुढाकार घेतला असून, त्यांनी मदतीनिधीचे धनादेश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे सुपूर्द केले आहेत.

भारत आणि पोलांडमध्ये मैत्रीचं नव पर्व !

पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क २१ ते २३ ऑक्टोबरदरम्यान भारत दौऱ्यावर

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)

भारत आणि पोलंड यांच्यातील द्विपक्षीय संबंध अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची घडामोड समोर आली आहे. पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क २१ ते २३ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत भारताच्या दौऱ्यावर येणार आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निमंत्रणावरून हा दौरा आयोजित करण्यात आला आहे. या भेटीदरम्यान दोन्ही देशांमधील धोरणात्मक भागीदारीचा आढावा घेतला जाणार असून, व्यापार, गुंतवणूक, संरक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञानासह विविध क्षेत्रांतील सहकार्य वाढवण्यावर भर दिला जाणार आहे.

नरेंद्र मोदी आणि डोनाल्ड टस्क यांच्यात द्विपक्षीय चर्चा – पोलंडचे पंतप्रधान डोनाल्ड टस्क २२ ऑक्टोबर रोजी नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेणार आहेत. या बैठकीत दोन्ही नेते भारत–पोलंड संबंधांच्या विविध पैलूंचा आढावा घेतील. तसेच प्रादेशिक आणि जागतिक घडामोडींवरही विचारांची देवाणघेवाण केली जाणार आहे. ऑगस्ट २०२४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पोलंडचा दौरा केला होता. त्यावेळी भारत आणि पोलंड यांच्यातील संबंधांना धोरणात्मक भागीदारीचा दर्जा देण्यात आला होता. आता टस्क यांच्या भारत दौऱ्यात या भागीदारीअंतर्गत झालेल्या प्रगतीचा आढावा घेतला जाण्याची अपेक्षा आहे.



व्यापार, गुंतवणूक आणि संरक्षण क्षेत्रावर विशेष भर– या दौऱ्यात भारत आणि पोलंड यांच्यातील सहकार्याचा विस्तार करण्यासाठी अनेक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार आहे. यामध्ये प्रामुख्याने पुढील क्षेत्रांचा समावेश आहे.

देशात मतदान सक्तीचे करण्यासाठी कायदा करण्यात यावा : केंद्रीय राज्य मंत्री ना.रामदास आठवले

मतदान सक्तीचे असावे कायद्यासाठी पंतप्रधान मोदींना निवेदन

नागपूर/मुंबई (समर्थ गांवकरी)

भारत निवडणूक आयोगाकडून एसआयआरची प्रक्रिया राबविण्यात येत आहे. या प्रक्रियेच्या माध्यमातून कोट्यवधी मतदारांची नावे यादीतून करण्यात आली. यावर विरोधी पक्षांकडून आक्षेप घेण्यात आले. आतातर या प्रक्रियेवरून केंद्रीय निवडणूक आयुकांच्यामध्येच मतभेद असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या प्रक्रियेवरच आक्षेप घेण्यात येत आहे. रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. राम दास आठवले यांनी या प्रक्रियेचे समर्थन केले. त्याच प्रमाणे त्यांनी मतदान सक्तीचे करण्याची मागणी करीत त्यासाठी कायदा करण्याचे मत व्यक्त केले.





ना. रामदास आठवले म्हणाले की, मतदान प्रत्येकाने केले पाहिजे. मतदान सक्तीचा करण्यासाठी कायदा केला गेला पाहिजे. याबाबत मी संसदेत निवेदन केले आहे. त्याच प्रमाणे प्रधानमंत्री (पीएम) नरेंद्र मोदी यांना निवेदन सुद्ध दिले आहे. सीमेवरील सैनिक किंवा अधिकारी हे पोस्टाद्वारे मतदान करतात. त्याच प्रमाणे दिव्यांग, ज्येष्ठांना तशी सोय उपलब्ध करून दिली पाहिजे. त्यांच्या घरी मतदानासाठी अधिकारी गेला पाहिजे. मतदान प्रत्येकाने करण्याची गरज असल्याचे ते म्हणाले.

ना. रामदास आठवले म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहिले. त्यांनीही धर्मांतर केले. तशी तरतूदच आहे. डॉ. आंबेडकरांनी केलेले धर्मांतर हे संविधानाच्या चौकटीत आहे. परंतु बळजबरी, पैशाचे आमिष दाखवून केलेले धर्मांतर हे बेकायदा असून ते मान्य नसल्याचे ना. रामदास आठवले म्हणाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यम ातून गरीब, कामगार, शोषित, वंचितांना सामाजिक न्याय देण्याची भूमिका त्यांची होती. हे संविधान बदलण्याचा अधिकार कुणाला नाही. विरोधक संविधान बदल्यण्याच्या प्रयत्नात असल्याचा आरोप ना. रामदास आठवले यांनी केला.

ना. रामदास आठवले म्हणाले की, ज्ञानेश कुमार यांनी अतिशय उत्तम प्रक्रिया राबविली. एसआयआरच्या माध्यमातून मतदार यादी शुद्धीकरण करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. १३ कोटी मतदार वगळेत. यातील ६.२ कोटी मतदार हे स्थलांतरित आहेत. तर २.८ मतदार मृत आहेत. तर ३ कोटी मतदार हे बेपत्ता दिसून आलेत. १ कोटी मतदार हे दुबार असल्याचे त्यांनी नावे वगळण्यात आलीत. त्यांनी राबविलेल्या प्रक्रियेमुळे बांगलादेशी सुद्धा समोर आल्याचा दावा त्यांनी केला. त्यांची प्रक्रिया चांगली असल्याने त्यांना राजीनामा देण्याची गरज नाही. विरोधकांच्या आंदोलनाचा फारसा परिणाम होणार नाही. आंदोलनातून सत्ता बदलण्याचा प्रयत्न त्यांना यशस्वी होणार नाही. निवडणुकीतून त्यांनी सत्ताबदल करावा, असे ना. रामदास आठवले म्हणाले.

जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार आवारासाठी नान्नज येथे २.४० हेक्टर शासकीय जमीन मंजूर!

बाजार समिती सभापती पै. शरद कार्ले व संचालक मंडळाच्या मागणीला यश

जामखेड (समर्थ गांवकरी)

नान्नज येथे उपबाजार व्हावा यासाठी गेली तीन वर्षांपासून केलेल्या पाठपुराव्याला आता मोठे यश आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या सूचनेनुसार २.४० हेक्टर शासकीय जमीन मंजूर करण्यात आल्याची माहिती जामखेड बाजार समितीचे सभापती पै. शरद कार्ले यांनी दिली आहे.

जामखेड तालुक्यातील नान्नज येथील २ हेक्टर ४० आर शासकीय जमीन जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीला उपबाजार आवार उभारण्यासाठी नाममात्र १ रुपये कब्जेहक्क रकमेवर प्रदान करण्यास महसूल विभागाने मान्यता दिली आहे.

नान्नज हे अंतर जामखेड पासून पंधरा ते सतरा किलोमीटर इतके असून तेथील शेतकऱ्यांना जामखेड बाजारळक्ष समितीत आपला शेतमाल आणण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. तसेच वाहतूक खर्च ही करावा लागत होता. किंवा बाजार समितीचे लायसन नसलेल्या इतर दुकानदारांकडे विक्री करावा लागत होता. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची समोर आले. या पार्श्वभूमीवर नान्नज परिसरातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड बाजार समितीचे सभापती पै. शरद कार्ले यांनी उपसभापती व संचालक मंडळ यांची बैठक घेऊन नान्नज येथे उपबाजार समिती सुरू करण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी यासाठी सरकारकडे पाठपुरावा केला. गेली तीन वर्षापासून करत असलेल्या या पाठपुराव्याला नुकतेच मोठे यश आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार आवारासाठी नान्नज येथे २.४० हेक्टर शासकीय जमीन मंजूर करण्यात आल्याचा शासन निर्णय काढण्यात आला आहे. या निर्णयामुळे नान्नज परिसरातील शेतकऱ्यांना कृषी मालाच्या खरेदी–विक्रीसाठी सुविधा उपलब्ध होऊन स्थानिक कृषी व्यापाराला चालना मिळणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे साहेब यांचे आभार मानले आहेत.



CJP कडून ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करणे योग्य नाही : केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले

केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले ज्ञानेश कुमार यांच्या समर्थनार्थ

नागपूर/मुंबई (समर्थ गांवकरी)

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी अनुचित असल्याचे सांगितले. त्यांनी विरोधकांना मतदार यादीत काही त्रुटी असल्यास त्याबाबत सूचना देण्याचा सल्ला दिला. ना.रामदास आठवले यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनावर प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी सांगितले की, प्रत्येक मुद्द्यावर राजीनाम्याची मागणी करणे योग्य नाही. त्यांच्या मते, निवडणूक आयोगाच्या यादीत काही चूक असल्यास किंवा एखाद्याचे नाव यादीतून वगळले गेले असल्यास, ती दुरुस्त करण्यासाठी सूचना देता येऊ शकतात.

ना.रामदास आठवले म्हणाले, मला वाटते की उगझ कडून ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करणे योग्य नाही. त्यांनी विद्यार्थ्यांसाठी आंदोलन केले होते. NEET परीक्षेच्या पेपरफुटीच्या प्रकरणात आंदोलन करणे समजू शकते; परंतु प्रत्येक मुद्द्यावर राजीनाम्याची मागणी करत आंदोलन करत राहणे योग्य नाही. ना.रामदास आठवले यांनी निवडणूक आयोगाने तयार केलेल्या यादीचे समर्थन करताना सांगितले, मला वाटते की ज्ञानेश कुमार यांनी तयार केलेली यादी योग्य आहे. जर एखाद्याचे नाव यादीतून वगळले गेले असेल, तर त्यांनी ते नाव पुन्हा समाविष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.



महाराष्ट्राच्या समृद्ध लोककला आणि संगीत परंपरेचा राष्ट्रीय गौरव

शास्त्रीय गायनापासून भारूड, शाहिरी, पोवाडा आणि बाहुलीनाट्य या कला प्रकारात सहा युवा कलावंतांना 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार

नवी दिल्ली (समर्थ गांवकरी)









महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशातील विविध कलापरंपरांचा राष्ट्रीय स्तरावर गौरव झाला असून, राज्यातील सहा युवा कलावंतांना संगीत नाटक अकादमीच्या प्रतिष्ठित 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कारां'ने सन्मानित करण्यात आले. हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतापासून महाराष्ट्राच्या लोकजीवनाशी नाळ जोडलेल्या भारूड, शाहिरी, पोवाडा आणि पारंपरिक बाहुलीनाट्यापर्यंत विविध कलाप्रकारांत योगदान देणाऱ्या या कलावंतांच्या सन्मानामुळे राज्याच्या सांस्कृतिक वैभवाला राष्ट्रीय व्यासपीठावर नवी ओळख मिळाली आहे.

केंद्रीय संस्कृती व पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांच्या हस्ते नवी दिल्लीतील रवींद्र भवन परिसरातील मेघदूत थिएटर कॉम्प्लेक्स येथे झालेल्या समारंभात सन २०२४ आणि २०२५ या वर्षांसाठी देशभरातील एकूण १०६ युवा कलावंतांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार'अंतर्गत २५ हजार रुपये रोख, ताम्रपट आणि अंगवस्त्र देऊन कलावंतांचा सन्मान करण्यात येतो. युवा प्रतिभेला प्रोत्साहन देणे, पारंपरिक कलांचे जतन व संवर्धन करणे आणि भारतीय कला–संस्कृतीचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविणे हा या पुरस्कारांचा प्रमुख उद्देश आहे.

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैविध्याचे प्रतिबिंब

हिंदुस्तानी शास्त्रीय गायनातील योगदानाबद्दल कृष्ण बोंगाने आणि अंकिता जोशी यांना सन २०२४ चा संयुक्त युवा पुरस्कार प्रदान करण्यात आला. पारंपरिक 'बहुरूपी भारूड' या लोककलाप्रकाराच्या संवर्धनासाठी डॉ. भावार्थ रामचंद्र देखणे यांना गौरविण्यात आले. पारंपरिक कलासूत्री बाहुलीनाट्य कलेच्या जतन व संवर्धनासाठी बालकृष्ण (कृष्णा) गणपत मसगे यांना सन २०२४ चा युवा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

सन २०२५ च्या पुरस्कारांमध्ये हार्मोनियम वादनातील योगदानाबद्दल तन्मय देवचके, तर शाहिरी, पोवाडा आणि लोकगीतांचा अभ्यास, संशोधन व प्रसार यांसाठी प्रवीण प्रताप जाधव यांचा सन्मान करण्यात आला. तन्मय देवचके हे पुरस्कार वितरण समारंभास उपस्थित नव्हते.

महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख ही शास्त्रीय संगीत, संतपरंपरेशी संबंधित लोककला, शाहिरी, पोवाडे आणि विविध पारंपरिक सादरीकरणांच्या समृद्ध संगमातून घडली आहे. या कलापरंपरा केवळ मनोरंजनाची साधने नसून त्या समाजाचा इतिहास, लोकजीवन, विचारविश्व आणि सांस्कृतिक अस्मिता जपण्याचेही काम करतात. या पार्श्वभूमीवर सहा युवा कलावंतांना मिळालेला पुरस्कार म्हणजे महाराष्ट्राच्या विविधांगी कलाविश्वातील योगदानाची राष्ट्रीय पातळीवर घेतलेली दखल आहे.

या समारंभास केंद्रीय संस्कृती मंत्रालयाचे सचिव विवेक अग्रवाल, संगीत नाटक अकादमीच्या अध्यक्षा डॉ. संध्या पुरेचा, अकादमीचे उपाध्यक्ष अनवर खान मांगणियार आणि सचिव राजू दास उपस्थित होते.

इंग्रजीची भीती दूर करून आत्मविश्वास वाढविण्यासाठी 'प्रवक्ता अकॅडमी'चा अभिनव उपक्रम!

श्रीगोंद्यात स्पोकन इंग्लिश अकॅडमीचे मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन; विद्यार्थ्यांसाठी एआय लॅबसह आधुनिक शिक्षणाची सुविधा

श्रीगोंदा (समर्थ गांवकरी)

इंग्रजी भाषा ही आजच्या स्पर्धात्मक युगात शिक्षण, रोजगार आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी महत्त्वाची ठरत आहे. विद्यार्थ्यांसह सर्व वयोगटांतील नागरिकांना इंग्रजी भाषेत आत्मविश्वासाने संवाद साधता यावा, या उद्देशाने श्रीगोंदा येथे सुरू करण्यात आलेल्या 'प्रवक्ता स्पोकन इंग्लिश अकॅडमी'चे उद्घाटन रविवार, दि. १८ ऑक्टोबर रोजी प्रवक्ता अकॅडमीचे अध्यक्ष रवींद्र पाटील, माजी मंत्री तथा आमदार बबनरावजी पाचपुते आणि श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे यांच्या शुभहस्ते उत्साहात पार पडले.

या उद्घाटन सोहळ्यास श्रीगोंदा नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षा अलकाताई दरेकर-अनभुले, श्रीगोंदा सहकारी साखर कारखान्याचे संचालक सुभाष काका शिंदे (म ढेवडगाव), श्रीगोंदा नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ९ चे नगरसेवक प्रशांत गोरे, प्रवक्ता अकॅडमीचे पश्चिम महाराष्ट्र विभागप्रमुख सागर वाघ-पाटील, अकॅडमीच्या संचालिका निकिता वाघ-पाटील, सोनवणे गांधी पॉलिटेक्निक कॉलेजचे प्राचार्य अमोल नागवडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने इंग्रजी संभाषणाचा सराव- उद्घाटनप्रसंगी अध्यक्षीय भाषणात प्रवक्ता अकॅडमीचे अध्यक्ष रवींद्र पाटील यांनी श्रीगोंदा शाखेतील आधुनिक शैक्षणिक सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या इंग्रजी संभाषण कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले.

यावेळी आमदार बबनरावजी पाचपुते, कारखान्याचे चेअरमन राजेंद्रदादा नागवडे, संचालक सुभाष काका शिंदे, उपनगराध्यक्षा अलकाताई दरेकर-अनभुले, नगरसेवक प्रशांत गोरे, पश्चिम महाराष्ट्र विभागप्रमुख सागर वाघ-पाटील आणि संचालिका निकिता वाघ-पाटील यांनी मनोगत व्यक्त करून अकॅडमीच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

प्रवक्ता अकॅडमीच्या माध्यमातून इंग्रजी संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी विविध अभ्यासक्रम उपलब्ध करून दिले जाणार आहेत. विशेष म्हणजे, या अभ्यासक्रमांसाठी वयाची कोणतीही अट नसल्याने विद्यार्थी, तरुण, नोकरदार तसेच इंग्रजी बोलण्याची इच्छा असलेल्या सर्वांना या सुविधेचा लाभ घेता येणार आहे.

अकॅडमीमध्ये अत्याधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानावर आधारित लॅबची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. शिक्षकांच्या मार्गदर्शनासोबतच सहविद्यार्थ्यांशी इंग्रजीत संवाद साधणे, समूहचर्चा (ग्रुप डिस्कशन) आणि विविध संवादात्मक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना नियमित सरावाची संधी दिली जाणार आहे. त्यामुळे केवळ इंग्रजीचे ज्ञान मिळविण्यापुरते मर्यादित न राहता, प्रत्यक्ष संभाषण करताना आत्मविश्वास वाढविण्यावर भर दिला



जाणार आहे.

विद्यार्थ्यांसाठी दोन दिवस मोफत डेमो क्लास- अकॅडमीच्या उद्घाटनानिमित्त बुधवार आणि गुरुवार या दोन दिवशी विद्यार्थ्यांसाठी मोफत डेमो क्लासचे आयोजन करण्यात आले आहे. श्रीगोंदा शहरासह परिसरातील विद्यार्थी, पालक आणि नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अकॅडमीच्या वतीने करण्यात आले आहे.

या उद्घाटन सोहळ्यास श्रीगोंदा शहरातील ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अकॅडमीचा पत्ता व संपर्क

पत्ता : बँक ऑफ इंडिया शाखा, श्रीगोंदा समोर, होळी गल्ली, भोंग कॉम्प्लेक्स, पहिला मजला, श्रीगोंदा.

संपर्क : सोनवणे सर - ८९७५७६३८३७ / ९४२२२२३८३७

अधिक माहितीसाठी व प्रवेशासंबंधी चौकशी करण्यासाठी दिलेल्या संपर्क क्रमांकांवर संपर्क साधावा

शेतकऱ्यांना केंद्राकडून मदत मिळवून देणार : केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

बीड/मुंबई (समर्थ गांवकरी)

दुष्काळामुळे शेतकरी, शेतमजूर आणि हातावर पोट असलेल्या कुटुंबांचे जगणे कठीण झाले असून, बीडसह मराठवाड्यातील दुष्काळग्रस्तांना तातडीने मदत मिळावी यासाठी केंद्र सरकारकडे मागणी करणार असल्याची ग्वाही रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी दिली.

बीड जिल्ह्यासह म राठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती गंभीर बनली आहे. शेतकरी, शेतमजूर, काम गार आणि मोलमजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या कुटुंबांना आर्थिक मदत मिळणे आवश्यक आहे. गावागावांत रोजगार हमीची कामे सुरू करून दुष्काळग्रस्तांना दिलासा द्यावा, अशी मागणी ना. रामदास आठवले यांनी केली.

रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष



पप्पू कागदे यांनी दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना प्रतिकुटुंब एक लाख रुपये, तर शेतमजूर, कामगार आणि मोलमजुरी करणाऱ्या कुटुंबांना ५० हजार रुपये आर्थिक मदत देण्याची मागणी केली.

यावेळी अण्णासाहेब रोकडे, मिलिंद शेळके, ॲड. ब्रह्मानंद चव्हाण, सिद्धार्थ कासारे, सचिन मोहिते, राजू जोगदंड यांच्यासह रिपाइंचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. सूत्रसंचालन ॲड. सुरेश वडमारे आणि प्रा. बाळासाहेब गव्हाणे यांनी केले.

सुप्रिया सुळे यांच्या जावयाला हजारो एकर गायरान जमीन भाडेतत्त्वावर देण्याची तयारी दाखवली जाते; मग वंचित, गोरगरीब आणि म ागास समाजातील लोकांना जमीन देताना सरकार मागे-पुढे का पाहते, असा सवाल रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे ऑयांनी केला.

सुधारित वेतनश्रेणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून कामकाज

१७ नोव्हेंबर पासुन बेमुदत संपाचा इशारा

जामखेड (समर्थ गांवकरी)

'समान काम समान वेतन' या तत्वानुसार सुधारित वेतनश्रेणी लागू करण्याच्या प्रलंबीत मागणीसाठी न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी दि १६ व १७ ऑक्टोबर २०२६ रोजी रोजी काळ्या फिती लावून कामकाज करत शासनाचे लक्ष वेधले.

सविस्तर असे की, मा. उच्च न्यायालयाने महाराष्ट्र राज्यातील दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांच्या सुधारीत वेतनश्रेणीचा प्रस्ताव शासनाकडे पाठवलेला आहे. सदरचा प्रस्ताव गेल्या २० ते २२ महिन्यांपासुन शासनाकडे मंजुरीसाठी प्रलंबीत आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्य गट क महासंघ, लघुलेखक महासंघ, बेलिफ महासंघ व शिपाई महासंघ यांनी आंदोलन आणि १७ नोव्हेंबर पासुन बेमुदत संप पुकारलेला आहे. कर्मचाऱ्यांना आंदोलनाची व संपाची वेळ आल्याने कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचा सुर असल्याचे दिसुन आले. कर्मचाऱ्यांनी मागण्या मान्य न झाल्यास यावर्षीची दिवाळी साजरी करणार नसल्याचे देखील सांगितले आहे.

सदर आंदोलनास व संपास जामखेड वकील संघाने दि १६ ऑक्टोबर रोजी पाठींबा दिला आहे. यावेळी जामखेड वकील संघाचे अध्यक्ष हर्षल डोके यांनी न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे न्यायालयीन कामकाजातील योगदान पाहता तसेच 'समान काम समान वेतन' या तत्वाचा विचार करता कर्मचाऱ्यांची म ागणी योग्य व रास्त असल्याचे सांगितले. तसेच मा. सर्वो च्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांनी देखील समान कामासाठी समान वेतन मिळणे न्यायहक्क असल्याचे अनेक प्रकरणांमध्ये निवाडे केलेले असल्याचे ड डोके यांनी सांगितले. यावेळी जामखेड वकील संघाचे उपाध्यक्ष ॲड. घनशाम राळेभात, सचिव ॲड. शिवाजी लटपटे, माजी अध्यक्ष ॲड. पी. के. राऊत,ॲड. बी. व्ही. जायभाय, ॲड. जे. एम. कोल्हे, ॲड. ए. बी. कोरे, ॲड. एच. टी. काशिद, ॲड. सुधिर झरकर, ॲड. एन. एल. बोरा, ड. प्रदिप बोलभट, ॲड. नितीन राजपुरे, ॲड. रोहित काळे, ॲड. ऋषिकेश डुचे, ॲड. रुपेश पाटील, ॲड. प्रशांत काशिद,ॲड.दिपक गोपाळघरे तसेच वकील संघाचे पदाधिकारी व सदस्य तसेच न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते.

कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसाठी न्यायाधीश संघटनेने देखील पाठींबा दिलेला असुन बहुतांश आमदार, खासदार व मंत्री यांनी देखील पाठींब्याचे पत्र मुख्यमंत्री यांना पाठवलेले आहे. तसेच महाराष्ट्रातील अनेक वकील संघटनांनी देखील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीस व संपास पत्र देऊन पाठींबा दर्शवलेला आहे. न्यायालयीन कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव मान्य न झाल्यास राज्यातील सर्व न्यायीक कर्मचारी दिवाळी साजरी करणार नाहीत असे आशिष पारगांवकर यांनी बोलताना सांगितले.

तसेच कर्मचाऱ्यांचा मुलभुत हक्क डावलला जाऊ नये, महाराष्ट्रातील सर्व दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांना वेतनवाढीचा लाभ देण्यात यावा अशी मागणी जामखेडचे शिवसेना तालुका विधिप्रमुख ॲड. रोहित काळे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

शासनाने कर्मचा-यांच्या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा संप झाल्यास न्यायालयीन कामकाजावर म ोठा परिणाम होऊन पक्षकारांचे नुकसान होणार आहे असे मत जामखेड वकिल संघटनेचे अध्यक्ष ड. हर्षल डोके यांनी व्यक्त केले आहे.

आंबेगाव तालुक्यात शंभर टक्के दुष्काळी पंचनामे करणार. दिलीप वळसे पाटील

मंचर (समर्थ गांवकरी)

आंबेगाव आणि जुन्नर तालुक्यांचा दुष्काळी तालुक्यांच्या यादीत समावेश झाल्यानंतर आंबेगाव तालुक्यातील सर्व बाधित शेतकऱ्यांचे शंभर टक्के पंचनामे करून त्यांना शासकीय मदत मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणार असल्याचे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी सोमवार दि.१९ रोजी मंचर येथे झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

दुष्काळग्रस्तांना मदत करण्यासाठी उत्सवांवरील खर्चात बचत करून मुख्यमंत्री सहायता निधीसह गरजूंना सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले. भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या गव्हाण पूजन कार्यक्रमात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्यावर केलेल्या टिकेमुळे कोणाच्या भावना



दुखावल्या असतील, तर दिलगिरी व्यक्त करत असल्याचे त्यांनी सांगितले.साखरेची सरासरी किंमत प्रतिकिलो ५० रुपये आणि इथेनॉलला प्रतिलिटर ७० रुपये दर मिळावा, या राजू शेट्टी यांच्या मागण्यांना पाठिंबा असल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र, ऊसाला पहिली उचल म्हणून पाच हजार रुपये देणे सध्या शक्य नसल्याचे स्पष्ट केले.हुतात्मा बाबू गेनू सागर डिंभे धरण ९० ते ९५ टक्के भरले असले, तरी भविष्यातील पाणीटंचाईचा विचार करून शेतकऱ्यांनी पीक आणि जनावरांच्या चाऱ्याचे नियोजन करावे, असे आवाहन त्यांनी केले.पंचनामे पूर्ण झाल्यानंतर पात्र शेतकऱ्यांना शासकीय लाभ मिळवून देण्यासाठी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन पाठपुरावा करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

जिल्हा बँकेसाठी आंबेगावातून मीच उमेदवार : दिलीप वळसे पाटील

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीसाठी आंबेगाव तालुक्यातून मीच उमेदवार असून, निवडणूक जाहीर झाल्यानंतर सर्व गोष्टी स्पष्ट होतील, असे माजी गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांनी सांगितले.जिल्हा बँकेच्या निवडणुकीसंदर्भात माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्याशी चर्चा झाली असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नवीन नियमानुसार आगामी काळात जे निर्णय आवश्यक ठरतील, ते परिस्थितीचा आणि सर्व बाबींचा अभ्यास करून घेतले जातील. यामध्ये कोणतीही अडचण असल्याचे कारण नाही. निवडणूक जाहीर झाल्यानंतर योग्य त्या बाबींवर निर्णय घेतला जाईल, असेही वळसे पाटील यांनी नमूद केले.

बसमध्ये मिळणार विमानातील सुविधा

पाच तरूणांनी एकत्रित येत घडविली ट्रॅव्हल्स क्षेत्रात क्रांती

ठाणे (समर्थ गांवकरी)

बसप्रवासात एखाद्या प्रवाशाला नैसर्गिक विधी करावयाची असल्यास गाडी थांबवावी लागते. अनेकदा तर बस लागणाऱ्या प्रवाशांचा इतर प्रवाशांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. या सर्व समस्यांवर मात करून बिनत्रासाचा आणि निर्धोक प्रवास करता यावा, यासाठी एका ठाणेकरासह पाच तरूणांनी चक्क रेल्वे आणि विमानातील सुविधा पुरवता येतील, अशी बसगाडी रस्त्यावर उतरविली आहे.

वेलो बस या कंपनीचा संचालक शैलेश बोरणारे के. व्हि. शेट्टी, दिलीप मानकुंबरे, पंकज सिंग आणि सुनील काटकर या पाचजणांनी प्रवासी वाहतुकीम ध्ये क्रांती घडविणारी आंतरराज्यीय बससेवा सुरू केली आहे. सोमवारी या बससेवेचे उद्घाटन करण्यात आले.

वेलो बस या नावाने ही बससेवा मुंबई ते हैदराबाद, मुंबई ते इंदोर- उज्जैन, मुंबई ते गोवा, मुंबई- बेंगळुरू, आणि हैदराबाद ते गोवा मार्गावर धावणार आहेत. या बसमध्ये आरामदायक सिट्ससह फायर अलार्म, अग्निशमन यंत्रणा, लक्झरी सिट्स , सीसीटीव्ही, बेडशिट- ब्लँकेट, चार्जर ६ ते ७ आपत्कालीन मार्गासह बसम ध्येच ऑनबोर्ड प्रसाधनगृहाचीही सुविधाही



देण्यात आली आहे. पूर्णपणे वातानुकूलित असलेल्या या बीएस ६ प्रणालीच्या या बसगाड्या अत्यंत आरामदायी आणि वेगवान प्रवासाची हमी देणार्या असणार आहेत. शिवाय, बसमध्ये पाणी आणि इतर सुविधाही देण्यात येणार आहेत. नवरात्रोत्सव ५० बस सुरू करण्यात आल्या असून देशभर ५०० बसगाड्या सुरू करण्यात येणार असल्याचे शैलेश बोरणारे यांनी सांगितले. दसऱ्याच्या मुहुर्तावर या बसगाड्या रस्त्यावर धावणार आहेत. या सेवेबद्दल अधिक माहिती www.velobus.in या संकेतस्थळासह ८६५५८०८१५३, ८६५५८०८१५४, ८६५५८०८१५५, ८६५५८०८१५६ या क्रमांकावर मिळेल, असे शैलेश बोरणारे यांनी सांगितले

संगमनेर येथे अवघ्या आठ मिनिटांत दोन मंगळसूत्रांवर डल्ला! नवरात्रोत्सवात महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर; स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवायांवरही प्रश्नचिन्ह?

संगमनेर (समर्थ गांवकरी)

एकीकडे नवरात्रोत्सवात देवीशक्तीचा जागर सुरू असताना दुसरीकडे संगमनेर शहरात भरदिवसा महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्रे ओरबाडून नेण्याच्या दोन घटना अवघ्या आठ मिनिटांच्या अंतराने घडल्याने शहरात खळबळ उडाली आहे. रविवारी (दि. १८ ऑक्टोबर) सकाळी काळ्या रंगाच्या पल्सर दुचाकीवरून आलेल्या दोन चोरट्यांनी दोन महिलांना लक्ष्य करत त्यांचे मंगळसूत्र लंपास केले. मालपाणी हॉस्पिटलसमोर सकाळी १० वाजून ३९ मिनिटांनी पहिली घटना घडली, तर त्यानंतर अवघ्या आठ मिनिटांनी म्हणजेच १० वाजून ४७ मिनिटांनी पुणे-नाशिक महामार्गावरील १३२ केव्ही उपकेंद्रासमोर दुसरी घटना घडली. दोन्ही घटनांमध्ये एकाच प्रकारे चोरी झाल्याचे समोर आल्याने शहरातील महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

संगमनेर शहर पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गणेशविहार परिसरात राहणाऱ्या सोनाली म्हातारबा गोल्हार या रविवारी सकाळी आपल्या मुलाला शिकवणीला सोडून पायी घरी परतत होत्या. सकाळी १० वाजून ३९ मिनिटांच्या सुमारास त्या जाणता राजा मैदानाजवळील मालपाणी हॉस्पिटलसमोर आल्या असताना समोरून काळ्या रंगाच्या पल्सर दुचाकीवरून दोन अनोळखी व्यक्ती आल्या. दोघांनीही तोंडाला रुमाल बांधलेला होता. दुचाकीवर मागे बसलेल्या चोरट्याने क्षणाचाही विलंब न करता गोल्हार यांच्या गळ्यातील मंगळसूत्रावर झडप घातली. सुमारे सव्वा लाख रुपये किमतीचे मंगळसूत्र ओरबाडून दोघांनी घटनास्थळावरून पळ काढला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे गोल्हार यांना सावरण्याचीही संधी मिळाली नाही. त्यांनी आरडाओरड केली; मात्र त्या वेळी परिसरात वर्दळ कमी असल्याचा फायदा घेत चोरटे पसार झाले.

पहिल्या घटनेनंतर अवघ्या आठ मिनिटांतच दुसऱ्या महिलेच्या गळ्यातील मंगळसूत्र चोरीस गेल्याने चोरट्यांनी शहरात किती बिनधास्तपणे वावर केला, हे स्पष्ट झाले. ऐश्वर्या पेट्रोलपंपाच्या पाठीमागील परिसरात राहणाऱ्या निर्मला वसंत तळेकर या पायी जात असताना सकाळी १० वाजून ४७ मिनिटांच्या सुमारास काळ्या रंगाच्या पल्सर दुचाकीवरून आलेल्या दोघांनी त्यांना लक्ष्य केले. दुचाकीवर मागे बसलेल्या चोरट्याने त्यांच्या गळ्यातील एक तोळा वजनाचे मंगळसूत्र ओरबाडले. त्यानंतर दोघांनी साईश्रद्धा चौकाच्या दिशेने वेगाने पळ काढला. एकाच सकाळी, दोन वेगवेगळ्या ठिकाणी आणि अवघ्या काही मिनिटांच्या अंतराने घडलेल्या या घटनांमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

दोन्ही महिलांनी संगमनेर शहर पोलीस ठाण्यात धाव घेतल्यानंतर घटनांमधील साम्य समोर आले. दोन्ही ठिकाणी काळ्या रंगाची पल्सर दुचाकी, तोंडाला रुमाल बांधलेले दोघे आणि मागे बसलेल्या व्यक्तीकडून मंगळसूत्र ओरबाडण्याची एकसारखी पद्धत वापरण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. नगरपालिकेच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांमध्ये टिपलेल्या दृश्यांच्या आधारे दोन्ही घटना एकाच चोरट्यांच्या जोडीने केल्याचा संशय व्यक्त होत आहे. चोरीनंतर आरोपी लोणीच्या दिशेने पसार झाल्याची माहितीही समोर आली आहे. त्यामुळे पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवून त्यांचा माग काढण्याचे आव्हान स्वीकारले आहे. दोन्ही घटनांमध्ये महिलांच्या गळ्यातील मौल्यवान दागिने काही क्षणांत हिसकावून नेण्यात आल्याने अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी अधिक सतर्क राहण्याची गरज व्यक्त होत आहे.

नवरात्रोत्सवात शहरातील मंदिरांमध्ये दर्शनासाठी महिला, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. तसेच गरबा आणि दांडियाच्या कार्यक्रमांमुळे सायंकाळच्या वेळी महिलांची वर्दळ वाढते. अशा काळात महिलांच्या सुरक्षिततेला विशेष महत्त्व असताना भरदिवसा दोन महिलांच्या मंगळसूत्रांवर डल्ला मारण्यात आल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. केवळ गर्दीच्या ठिकाणीच नव्हे, तर महिलांची नियमित ये-जा असलेल्या रस्त्यांवर, रुग्णालये, शैक्षणिक संस्था आणि कमी वर्दळीच्या परिसरातही पोलिसांची गस्त प्रभावी असणे आवश्यक आहे. महिलांना निर्भयपणे घराबाहेर पडता यावे, यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी होत आहे.

दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून संगमनेर शहर आणि परिसरात स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवायांची चर्चा सुरू आहे. अवैध व्यवसाय, गुटखा आणि गोवंश तस्करीसारख्या विषयांवर कारवाया होत असताना शहरात भरदिवसा अशा प्रकारच्या चोरीच्या घटना घडल्याने पोलिसांच्या गस्तीच्या नियोजनाबाबत आणि गुन्हेगारांवरील प्रतिबंधात्मक कारवाईबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. काही काळ नियंत्रणात असल्याचे दिसणाऱ्या गुटख्याच्या अवैध विक्रीसारख्या प्रकारांबाबतही नागरिकांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. स्थानिक गुन्हे शाखेच्या कारवायांचा गुन्हेगारांवर कितपत धाक निर्माण झाला आहे आणि महिलांच्या सुरक्षेसाठी प्रत्यक्षात कोणत्या उपाययोजना केल्या जात आहेत, याबाबत चर्चा सुरू झाली आहे. तथापि, मंगळसूत्र चोरीच्या या दोन घटनांमागे कोण आहे आणि आरोपींचा इतर गुन्ह्यांशी काही संबंध आहे का, हे पोलीस तपासातूनच स्पष्ट होणार आहे.

नवरात्रोत्सवाच्या काळात महिलांच्या गळ्यातील मंगळसूत्रे हिसकावून नेण्याच्या या घटना केवळ



चोरीपुरत्या मर्यादित नसून महिलांच्या सुरक्षिततेशी संबंधित गंभीर बाब आहे. भरदिवसा अवघ्या आठ मिनिटांत दोन महिलांना लक्ष्य करणाऱ्या चोरट्यांना तातडीने पकडणे, चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करणे आणि शहरात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी पोलिसांनी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे. सीसीटीव्ही फुटेज, प्रत्यक्षदर्शींची माहिती आणि घटनास्थळावरील पुराव्यांच्या आधारे तपासाला गती देण्याची गरज आहे. महिलांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस गस्त वाढविण्याबरोबरच संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणेही महत्त्वाचे ठरणार आहे. या प्रकरणाचा तपास किती वेगाने पुढे जातो आणि आरोपींना कधी अटक होते, याकडे आता संगमनेरकरांचे लक्ष लागले आहे.

लोकप्रतिनिधींनी सर्वसामान्यांच्या प्रश्नावर राजकारण करणे दुर्दैवी; सभापती गंगाराम बेलकर

राणीताई लंके यांच्या शुभहस्ते खामकर झाप मार्गे वडगाव सावताळ बसला हिरवा झेंडा

पारनेर (समर्थ गांवकरी)

लोकप्रतिनिधींनी जनतेच्या मूलभूत समस्या सोडविण्याला प्राधान्य दिले पाहिजे. मात्र, तालुक्यात सामान्य माणसांच्या प्रश्नांवरही राजकारण केले जाते, ही दुर्दैवाची बाब आहे. असे पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर मत व्यक्त केले.

पारनेर तालुक्यातील वडगाव सावताळ येथे स्वातंत्र्यानंतर प्रथमच खामकर झाप मार्गे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाची एसटी बससेवा सुरू झाली. टाकळी ढोकेश्वर जिल्हा परिषद गटाचे नेते तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते रवींद्र राजदेव यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे या बससेवेला मंजुरी मिळाली. सोमवार, दि. १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ वाजता पारनेर आगारात माजी जिल्हा परिषद सदस्या राणीताई निलेश लंके आणि पारनेर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गंगाराम बेलकर यांच्या प्रमुख उपस्थितीत बसला हिरवा झेंडा दाखवून सेवेचा शुभारंभ करण्यात आला.

वडगाव सावताळ, खामकर झाप आणि गाजदीपूर परिसरातील ग्रामस्थांकडून अनेक दिवसांपासून एसटी बससेवेची मागणी केली जात होती. या भागातील वाहतुकीची अडचण लक्षात घेऊन राजदेव यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा केला. अखेर प्रशासनाने बससेवेला हिरवा कंदील दिला. या निर्णयामुळे ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसह ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या कार्यक्रमाला राष्ट्रवादी काँग्रेसच्या डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. बाळासाहेब कावरे, राष्ट्रवादीच्या महिला नेत्या सोनिया राजदेव, जिल्हा प्रवक्ते मोहनराव रोकडे, शिक्षक नेते संतोष खामकर, युवा नेते महेंद्र गायकवाड, पारनेर आगार व्यवस्थापक अमोल कोतकर, रवींद्र कुस्कर, बाळासाहेब मते आदी उपस्थित होते.

बससेवा सुरू झाल्यामुळे परिसरातील ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण असून, दळणवळणाची सुविधा उपलब्ध झाल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणासह दैनंदिन प्रवासाचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.



वडगाव सावताळ, खामकर झाप परिसरातील ग्रामस्थांची एसटी बससेवेची मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित होती. सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे स्वातंत्र्यानंतर प्रथमच या भागात बससेवा सुरू होत आहे. यामुळे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य प्रवाशांची गैरसोय दूर होऊन ग्रामीण व आदिवासी भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

– रवींद्र राजदेव (जिल्हा परिषद गट, टाकळी ढोकेश्वर)

लोकशाही व संविधान विरोधी धोरणांचा निषेध; तिरंगा रॅली

लोकशाही व संविधान प्रेमी नागरिक पक्ष व संघटनांचे निवेदन

पारनेर (समर्थ गांवकरी)

लोकशाही, संविधान आणि नागरिकांच्या घटनात्मक मूलभूत अधिकारांची गळचेपी होत असल्याचा आरोप करत केंद्र सरकारच्या धोरणांचा निषेध नोंदविण्यासाठी पारनेर पोलीस प्रशासनास लोकशाही व संविधान प्रेमी नागरिक पक्ष व संघटनांचे वतीने निवेदन देण्यात आले.

दिल्लीतील जंतर-मंतर येथे सुरू असलेल्या विद्यार्थी, युवक, बेरोजगार आणि नागरिकांच्या आंदोलनाला पाठिंबा देत आंदोलकांवरील कथित पोलिसी अत्याचारांची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९ नुसार नागरिकांना अभिव्यक्तिस्वातंत्र्य, शांततेने एकत्र येण्याचा आणि आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मात्र, सरकारच्या विरोधात आवाज उठविणाऱ्या आंदोलकांना दडपण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. जंतर-मंतर येथील आंदोलनादरम्यान विद्यार्थी, युवती आणि आंदोलनाचे वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांना पोलिसांकडून मारहाण झाल्याचा आरोपही करण्यात आला. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करण्यात आली.निवेदनात निवडणूक प्रक्रिया अधिक पारदर्शक करण्यासाठी ईव्हीएमऐवजी बॅलेट पेपरचा वापर करावा, मतदारांचा अधिकार बाधित होत असल्याचा आरोप असलेली एसआयआर प्रक्रिया रद्द करावी, शिक्षणाचे बाजारीकरण थांबवावे आणि पेपरफुटीसारख्या प्रकारांना आळा घालण्यासाठी शिक्षण व्यवस्थेत सुधारणा कराव्यात, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत.दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कागदपत्रे व ऑनलाइन प्रक्रियेत न अडकवता सरसकट आर्थिक मदत द्यावी, जनावरांसाठी चारा छावण्या सुरू कराव्यात आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली. तसेच शेतमजूर, कामगार आणि बलुतेदारांना आर्थिक मदत देऊन बलुतेदारांची लघुउद्योगांसाठीची कर्जे माफ करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनात अंकिता भंडारी प्रकरणाचा उल्लेख करत दुष्यंतकुमार यांच्या राज्यपालपदावरील नियुक्तीबाबतही आक्षेप नोंदविण्यात आला आहे. तसेच आरएसएसवर कायमस्वरूपी बंदी घालण्याची मागणी करण्यात आली आहे.शासनाने या मागण्यांची गांभीर्याने दखल घ्यावी; अन्यथा आगामी काळात अधिक तीव्र स्वरूपाचे जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.



थोडक्यात पण महत्त्वाचे

नेवासा फाटा येथील जय भवानी मित्र मंडळाच्या दांडिया स्पर्धेत अंबिका माता दांडिया ग्रुपची बाजी!



नेवासा (समर्थ गांवकरी)

नेवासा फाटा येथील राजमुद्रा चौकातील श्रीनाथ प्रतिष्ठानच्या जय भवानी मित्र मंडळ आयोजित नवरात्र उत्सवाच्या निमित्त भव्य दांडिया स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.या स्पर्धेत शिवाजीनगर येथील अंबिका माता दांडिया ग्रुपने धडाकेबाज कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या ग्रुपने प्रथम बक्षीस म्हणून ५ हजार १ रुपयांचे रोख पारितोषिक पटकावले.लयबद्ध पावले,पारंपारिक वेशभूषा आणि एकसंघ सादरीकरणाच्या जोरावर अंबिका माता ग्रुपने परीक्षकांची व प्रेक्षकांची मने यावेळी जिंकली. या विजयानंतर ग्रुपच्या प्रमुख सदस्य मेनका राठोड,स्वाती कुटे,रुपाली माटे,मीना माटे,ज्ञानेश्वरी खेमनर यांनी मोठा आनंद व्यक्त केला नवरात्रीच्या उत्साहात रंगत आणणाऱ्या या स्पर्धेला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेत ग्रुप अहिल्यादेवी ग्रुप अहिल्यानगर नेवासा यांनी द्वितीय तर घुमर गर्ल्स अग्रवाल या ग्रुपने तृतीय क्रमांक पटकावला.या स्पर्धेत तेजश्री मैड,सुरेखा घुले,सौ.भारती करडक, शितल जायगुडे यांनी परीक्षक म्हणून तर पुनीत शिंदे, अविनाश गाडेकर वैभव धनगर यांनी डान्स कोरिओग्राफर म्हणून काम पाहिले नेवासा फाटा येथील जय भवानी मंडळाचे अध्यक्ष लखन भाऊ पारधी, उपाध्यक्ष निलेश निपुंगे, अनिल डावखर,रामभाऊ पारधी,पुनित शिंदे,अमोल पवार,सागर चव्हाण,ऋषिकेश पारधी, ऋषिकेश बोरुडे, राजू कुसळकर, ज्ञानेश्वर माटे,आदित्य निपुंगे,सुमित रोकडे,रोहित मोरे,प्रसाद खोमणे,प्रथमेश लिपाने,यश वांढेकर,अतुल पेचे,अभी शिरसागर,शिवम खेमनर,प्रतीक निपुंगे,सुभाष जाधव,श्रीनिवास राजगुरू यांच्या प्रमुख उपस्थितीत विजेत्याना पारितोषिकांचे वाटप करण्यात आले.

जुन्नर तालुक्यात दुष्काळ जाहीर झाल्यामुळे उपाययोजना व सवलती लागू

शिवनेरी (समर्थ गांवकरी)

जुन्नर तालुक्यात सन २०२६ च्या खरीप हंगामातील दुष्काळ जाहीर झाल्यामुळे उपाययोजना व सवलती लागू झालेले आहेत . अशी माहिती तहसीलदार रणजीत भोसले यांनी सांगितले आहे.

जुन्नर तालुक्यात दुष्काळ जाहीर झाल्यामुळे येथील सर्व शेतकऱ्यांना जमीन महसुलात सूट, पीक कर्जाचे पुनर्गठन, शेतीशी निगडित कर्जाच्या वसुलीत स्थगिती, कृषी पंपाच्या चालू वीज बिलाबाबत सूट , शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी ,रोहया अंतर्गत कामाच्या निकषात शिथिलता आणून जास्तीत जास्त कामे सुरू करणे , आवश्यक तेथे पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकरचा वापर, टंचाई जाहीर केलेल्या गावात शेतकऱ्यांच्या शेतीच्या पंपाचे वीज जोडणी खंडित न करणे , शेतीवर अस्त्रित शेतकरी व मजूरदार इत्यादी यांना अन्नधान्याची टंचाई होणार नाही याबाबत व्यवस्था , जनावरांना आवश्यक चारा उपलब्ध होईल याची व्यवस्था , जलसंधारणाची कामे सुरू करणे , अगोदरच निर्णय करण्यात आलेले शासन निर्देशाप्रमाणे पिण्याचे पाणी व जनावरांसाठी पाण्याचे नियोजन करणे , दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या शेत पिकाच्या नुकसानी बाबतची मदत जाहीर केली आहे. अशी माहिती तहसीलदार रणजीत भोसले यांनी सांगितले आहे.

श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयासमोरील रस्त्यावर गतिरोधक बसवा!

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी कॉलेज प्रशासनाची सार्वजनिक बांधकाम विभागाकडे लेखी मागणी

नेवासा (समर्थ गांवकरी)

नेवासा-नेवासा फाटा मुख्य रस्त्यावरील मुळा एज्युकेशन संस्थेच्या श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयासमोरील रस्त्यावर गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसविण्यात यावेत, अशी मागणी महाविद्यालय प्रशासनाच्या वतीने करण्यात आली आहे. पालकवर्गाने केलेल्या सूचनेनुसार महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांकडे लेखी निवेदनाद्वारे ही मागणी केली आहे.

नेवासा हे शैक्षणिक आणि धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे ठिकाण असून, श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयात दररोज हजारो विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ये-जा करतात. महाविद्यालय सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत प्रवेशद्वारासमोरील परिसरात विद्यार्थ्यांची मोठी गर्दी होते. अशा वेळी मुख्य रस्त्यावरून वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे विद्यार्थ्यांना रस्ता ओलांडताना अडचणींचा सामना करावा लागत आहे.

महाविद्यालयासमोरील रस्त्यावर वाहनांच्या वेगावर नियंत्रण नसल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. गेल्या काही दिवसांत या परिसरात लहान-मोठे अपघात घडल्याचे निदर्शनास आले असून, वेळीच उपाययोजना न केल्यास भविष्यात गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी चिंता महाविद्यालय प्रशासनाने निवेदनातून व्यक्त केली आहे.

विद्यार्थी आणि पादचाऱ्यांची सुरक्षितता लक्षात घेऊन महाविद्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारासमोरील रस्त्यावर योग्य आकाराचे गतिरोधक बसवावेत. तसेच आवश्यकतेनुसार वेगमर्यादा दर्शविणारे आणि वाहतुकीबाबत सूचना देणारे फलक लावावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.



विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याची गरज

शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात विद्यार्थ्यांची सुरक्षित ये-जा सुनिश्चित करणे ही सामूहिक जबाबदारी आहे. श्री ज्ञानेश्वर महाविद्यालयासमोरील वाढती वाहतूक आणि विद्यार्थ्यांची गर्दी लक्षात घेता, संबंधित विभागाने प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक सुरक्षा उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभाग या मागणीवर कोणती कार्यवाही करतो, याकडे विद्यार्थी, पालक आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सीताराम सारडा विद्यालयात भोंडला उत्सवाचा रंग - महाराष्ट्राच्या संस्कृतीचे दर्शन

भोंडला हा स्त्री शक्तीचा आणि एकोप्याचा उत्सव - नगरसेविका शितलताई ढोणे



अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

हिंद सेवा मंडळाच्या सीताराम सारडा विद्यालयात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त पारंपरिक भोंडला कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते.

भोंडला हा महाराष्ट्राच्या परंपरेचा आणि स्त्री शक्तीचा सुंदर उत्सव आहे. भोंडला या खेळामुळे एकोपा निर्माण होतो आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीची ओळख होते, असे प्रतिपादन नगरसेविका शितलताई ढोणे यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात संतोष गेनाप्पा व नगरसेविका सौ. सुनिता गेनाप्पा यांच्या हस्ते शारदा देवीचे विधिवत पूजन करून करण्यात आली. यावेळी पौराहित्य मनोज कोंडजकर यांनी केले.तसेच मान्यवरांच्या हस्ते गजलक्ष्मीचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी नगरसेविका शितलताई ढोणे, हिंद सेवा मंडळाचे कार्यकारी सदस्य डॉ. पारस कोठारी, सीताराम सारडा विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा, प्राथमिक शाळेच्या चेअरमन प्रा. ज्योती कुलकर्णी, मुख्याध्यापिका मंगला डोळस, पर्यवेक्षिका नंदा कानिटकर, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे, शिक्षक प्रतिनिधी विनोद जोशी, निमा राहिंज, शिक्षकेतर प्रतिनिधी गोवर्धन पांडुळे, गणेश नागपुरे, दीपक आरडे, अमोल कदम, दीपक शिरसाठ, प्रवीण लोखंडे, अनंत जोशी, रवींद्र चोभे, अजय पुंड, भारत औटी, क्रांती मुंदाणकर, शितल शिंदे, वृषाली जोशी, दिपाली लगड आदींसह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रा.ज्योती कुलकर्णी म्हणाल्या, नवरात्र उत्सवानिमित्त सर्वत्र चैतन्याचे वातावरण आहे. भोंडला कार्यक्रमात विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आहे. सकारात्मक विचार ठेवून आणि आशावादी राहून विद्यार्थ्यांनी आपल्या संस्कृतीचे व भारताचे नाव उज्वल करावे.

अजित बोरा म्हणाले, कार्यक्रमाला लाभलेले मान्यवर संतोष गेनाप्पा, नगरसेविका सुनिता गेनाप्पा व शितलताई ढोणे यांनी नगरच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. भोंडला कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या संस्कृतीचे सुंदर दर्शन घडविले. भोंडला नृत्य व गरबा नृत्याने सर्वांना भारावून टाकले. नगरसेविका शितलताई ढोणे यांनी मुलांना खाऊ चे वाटप केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुजाता खामकर यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत दीपक आरडे यांनी केले, तर आभार दीपक शिरसाठ यांनी मानले.

लोकमंगल गृहनिमाण प्रकरणात आता 'सहकार' कायद्याचा फास; प्रकाश कोटा आणि अशोक पुंड यांच्या अडचणी वाढणार

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर मधील नियोजित लोकमंगल गृहनिमाण सहकारी संस्था मर्यादित, नालेगाव या प्रकरणात आता सहकार विभागाने आक्रमक भूमिका घेतली आहे.

संस्थेची अधिकृत नोंदणी झालेली नसताना 'सहकारी' या शब्दाचा वापर करून जमीन खरेदी-विक्रीचे व्यवहार केल्याचा आणि नागरिकांची दिशाभूल करून आर्थिक फसवणूक केल्याच्या आरोप असलेल्या या प्रकरणात महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १४५ च्या कथित उल्लंघनासंदर्भातील वाढीव कलम दाखल करण्यासाठी सहकार विभागाने पोलिसांकडे कार्यवाही करण्याची मागणी केली आहे.

यापूर्वीच कोतवाली पोलीस ठाण्यात आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल असताना आता सहकार कायद्याच्या तरतुदींचाही मुद्दा पुढे आल्याने या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे.

या प्रकरणात नियोजित लोकमंगल गृहनिमाण सहकारी संस्थेचे मुख्य प्रवर्तक प्रकाश भुमय्या कोटा आणि प्रवर्तक अशोक बाळू पुंड यांच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. सहकारी संस्था उपनिबंधक, अहिल्यानगर तालुका कार्यालयाने पोलिसांना दिलेल्या पत्रात संस्थेच्या नोंदणीसाठी आवश्यक प्रस्ताव कार्यालयाकडे सादर करण्यात आला नसल्याचे नमूद केले आहे.

दरम्यान,संबंधित प्रवर्तकांनी नोंदणीचा प्रस्ताव सादर केला नसल्याचे कार्यालयाच्या अभिलेख कक्षातील नोंदणी रजिस्टरमध्ये स्पष्ट झाले असून,१४ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या पत्रातून संस्थेच्या नावाने करण्यात आलेल्या व्यवहारांच्या वैधतेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत.

तक्रारीची दखल घेत उपनिबंधक कार्यालयाने ३ डिसेंबर २०२४ रोजीच्या पत्राद्वारे तत्कालीन पोलीस अधीक्षकांकडे या प्रकरणी कारवाई करण्याची मागणी केली होती.त्यानंतर कोतवाली पोलिसांनी २५ ऑगस्ट २०२५ रोजी आणि १२ जून २०२५ रोजी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१६(२), ३१८(४) आणि ३(५) नुसार गुन्हा दाखल केल्याचे पोलिसांनी उपनिबंधक कार्यालयाला कळविले आहे.

सहकार विभागाने आता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम १४५ च्या कथित उल्लंघनासंदर्भातील वाढीव कलम त्याच गुन्ह्यात समाविष्ट करण्यासाठी पोलिसांकडे मागणी केली आहे.

जिवे मारण्याच्या गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपींना तात्काळ अटक करावी

अन्यथा २० ऑक्टोबर पासून नरोटे कुटुंबीय आमरण उपोषण करणार : अमोल राजू नरोटे यांचा इशारा

भोकर (समर्थ गांवकरी)

शेतीवरील धुऱ्यावर गवताचे कुंजाने टाकण्यावरुन मौजे कोळगाव खु.येथील राजु पा.नरोटे व अमोल नरोटे यांना जिवे मारण्याच्या गंभीर उद्देशाने हल्ला केला.यात राजु नरोटे हे मयत झाले असे समजुन आरोपी फरार झाले.या गंभीर गुन्ह्यांतील मुख्य आरोपी यांना अद्याप अटक करण्यात पोलिसांना यश आले नसुन या फरार आरोपींना तात्काळ अटक करून जेरबंद करावे अन्यथा दि.२० ऑक्टोबर रोजी पासुन भोकर तहसील कार्यालया समोर नरोटे कुटुंबीय आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा अमोल राजु नरोटे यांनी निवेदनाद्वारे तहसीलदार यांना दिला आहे.

तहसीलदार भोकर यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की,मौजे कोळगाव खु.येथील आरोपी दत्तप्रसाद किशन लाडकेकर, केशरबाई किशन लाडकेकर,मुकुंद नागोराव शिंदे,गोपाळ नागोराव शिंदे,दत्ताहरी गोपाळ शिंदे, विशाल गोपाळ शिंदे या सर्वांनी दुसऱ्यावर कचरा टाकण्याच्या अनुषंगाने राजु पा.नरोटे यांना शस्त्रांनी डोक्यात,पाठीवर हल्ला करून जिवे मारण्याच्या उदेशाने बेसुमार मारहाण करण्यात आले यावेळी घायाळ होऊन जमीनीवर कोसळले तेंव्हा अमोल नरोटे वडीलांना मारहाण होत असल्याने तेथे येताच त्याला ही लोखंडी रॉडने मारहाण करण्यात आली.या मारहाणीत तो ही गंभीर जखमी झाला.त्यानंतर आरोपी फरार झाले.त्यानंतर अमोल नरोटे यांच्या फिर्यादीवरून भोकर पोलीसांनी सदरील गुन्ह्यातील आरोपी विरुद्ध गुन्हा क्र. ४३३/२०२६ कलम १०९(१),३५१(३),३५२,१८९(२),१९१(२) बी एन एस या कलमान्वये एफआयआर पोलीस निरीक्षक विश्वंभर पल्लेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली दाखल झाला.याचा तपास सह-पोलीस निरीक्षक बाबासाहेब कांबळे यांच्या कडे देण्यात आला.यानंतर दि.१८ /८/२०२६ रोजी पोलिसांनी मुकुंद नागोराव शिंदे, दत्तप्रसाद किशन लाडकेकर,दताहरी गोपाळ शिंदे यांना अटक करण्यात आले. परंतु यातील मुख्य तिन आरोपी केशरबाई किशन लाडकेकर, गोपाळ नागोराव शिंदे, विशाल गोपाळ शिंदे हे फरार आरोपी अद्याप पोलीसांना सापडत नसल्याने नरोटे कुटुंबीय भितीच्या सावटाखाली वावरत आहेत कारण या फरार आरोपीता कडुन नरोटे परिवाराच्या जिवातास धोका आहे.त्यामुळे या गुन्ह्यांमधील फरार आरोपींना तात्काळ अटक करून न्याय द्यावा यासाठी यशवंत सेनेचे मराठवाडा प्रमुख नागोराव शेंडगे यांच्या नेतृत्वाखालील एक शिष्टमंडळ नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उप महानिरीक्षक, जिल्हा पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन आरोपींना तात्काळ अटक करावे अशी मागणी केली आहे. सदरील प्रकरणात पोलिस कोणाच्या दबावाखाली किंवा कशा मुळे आरोपीस अटक करत नाही हेच कळत नाही ? अशी शंका आहे.त्यामुळे सदरील प्रकरणातील मुख्य फरार आरोपींना त्वरित ताब्यात घ्यावे अन्यथा २० ऑक्टोंबर रोजी भोकर तहसील कार्यालयासमोर नरोटे कुटुंबीय आमरण उपोषणाला बसणार असल्याचे निवेदनकर्ते अमोल नरोटे यांनी इशारा दिला आहे.



तरी या प्रकरणाची भोकर पोलीस स्टेशन काय गंभीर दाखल घेईल याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

दैनिक समर्थ गांवकरी
विजयादशमी
सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा!


कु.सुमित सुभाष विशे


मा.श्री.सुभाष विशे
ठाणे जिल्हा उपाध्यक्ष
महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, मुंबई

सुमीत कन्स्ट्रक्शन
प्रोप्रा. श्री.सुभाष रामा विशे
मोबा.९६३७२२०८८८ / ९२८४३४२८२८
मु.पो.वासिंद, ता.शहापूर, जि.ठाणे

आमच्या असंख्य ग्राहकांना विजयादशमीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
लग्न बस्त्याची खास व्यवस्था.. उत्तम क्वालिटी आणि विनम्र सेवा
श्री.स्वामी समर्थ
एन्टरप्रायजेस
होलसेल वस्त्र दालन
होलसेल दरात ६ वार, ९ वार साड्या, टॉवेल, टोपी, शाल व मानपानाचे कपडे मिळतील.
श्रीनिवास, १७४०/१, भिंगारे गोडाऊन जवळ, कचेरी परिसर, अकोले, ता.अकोले - ४२२ ६०१, जि.अहिल्यानगर (महा)
मोबा.७५८८५१३१३३, ९४२३३८८३६०

समृध्दीचे दारी तोरण
आनंदाचा हा हसरा सण...
सोने लुटून हे शिलंगण,
हर्षाचे उधळू द्या अंगण...
सर्वांना विजयादशमीच्या मंगलमय शुभेच्छा!
मा.शेखर हनुमंत गोल्हार
सामाजिक कार्यकर्ते
ह.मु.ठाणे
मु.पो.हनुमंत, १३९६, इंदिरानगर, अंकाली,बेळगाव (कर्नाटक) ५९१२१३

सर्वांना विजयादशमीच्या मंगलमय शुभेच्छा!
।। जय भगवान ।।

समाजरत्न
मा.नानजीभाई
खिमजीभाई ठक्कर (ठाणावाला
शेठ एन.के.टी. ठाणावाला चॅरीटेबल ट्रस्ट
एन.के.टी. कॉलेज, खारकर आळी, (ठाणे) प.
ठाणे जिल्हा व्यापारी महामंडळ
ठाणे जिल्हा गुजराती समाज
श्री. कच्छ वागड लोहाणा महाजन



-: शुभेच्छूक :-
मा.श्री.शिवाजी धुमाळ
(सामाजिक कार्यकर्ते)

।। श्रीराम विजयते ।।
दैनिक समर्थ गांवकरी
विजयादशमी
निमित्त
सर्व नागरिकांना हार्दिक शुभेच्छा.
शुभेच्छुक :
मा.श्री.अतुल नवले
(सामाजिक कार्यकर्ते)
मु.पो.अकोले, ता.अकोले, जि. अहिल्यानगर

जनलक्ष्मी
ग्रा.बि.शेती सह.पतंसस्था मर्या; अकोले
सर्व सभासदांना विजयादशमीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!


मा.श्री.भाऊपाटील भिमाजी नवले
(संस्थापक चेअरमन)

मा.श्री.अशोक बन्सीलाल भळगट
(व्हा. चेअरमन)
सन्मा.संचालक मंडळ
मा.श्री.आत्माराम शंकर रंधे (कार्यकारी संचालक)
शाखा : अकोले, राजूर, कोतुळ, समशेरपूर, कळस, देवठाण, लिंगदेव, संगमनेर

आमच्या असंख्य ग्राहकांना विजयादशमीनिमित्त हार्दिक शुभेच्छा!
नंदु काका मैड ज्वेलर्स
ॲण्ड सन्स
अकोले, ता.अकोले, जि.अ.नगर
प्रोप्रा.गौरव मैड



-: शुभेच्छूक :-
मा.श्री.बाबासाहेब आभाळे
(सामाजिक कार्यकर्ते)

सर्वांना
विजयादशमीच्या
मंगलमय शुभेच्छा!
।। सदरक्षणाय खलनिग्रहणाय ।।
पोलीस स्टेशन, अकोले
पोलिस निरीक्षक : श्री.संदिप कोळी तसेच सर्व अधिकारी व पोलिस कर्मचारी

राष्ट्रीय महामार्गाचे अतिक्रमण व्यापा-यांनी दहा फूट स्वतः काढले आता एक इंच काढू देणार नाही : आ. रोहीत पवार

व्यापारी वर्गाला दिलासा देण्याचा प्रयत्न

जामखेड (समर्थ गांवकरी)



जामखेड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय म हामार्गाच्या लगतचे व्यापाऱ्यांनी एका बाजून स्वतः दहा फुटापर्यंतचे अतिक्रमण काढले आहे. आता एक इंच काढले जाणार नाही. तसेच पुढील आठवडय़ात जिल्हाधिकारी यांचे समवेत बैठक असून दुसऱ्या बाजूने किती काढायचे याबाबत जिल्हाधिकारी निर्णय घेणार आहेत अशी प्रतिक्रिया आ. रोहीत पवार यांनी पत्रकारांनी छेडलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

शुक्रवार दि. १६ रोजी आ. रोहीत पवार हे दुष्काळी आढावा दौऱ्यासाठी आले असता त्यांनी येथील शासकीय विश्रामगृहावर जामखेड शहरातील राष्ट्रीय महामार्गाच्या लगतचे अतिक्रमण संदर्भात अधिकारी व व्यापारी यांची बैठक घेतली. यानंतर पत्रकारांशी ते बोलत होते. जाम खेड शहरातील अतिक्रमणावरून मागील आठ दिवसापासून अधिकारी, व्यापारी तसेच सामाजिक कार्यकर्ते अवधूत पवार यांचे वेगवेगळी मत-मतांतरे येत असल्यामुळे मोठा गोंधळ निर्माण झाला आहे. त्यातही व्यापा-यांनी राष्ट्रीय महाम ार्गाच्या गटारीपासून दहा फूट अतिक्रमण काढले. तसेच काही अधिकाऱ्यांनी आणखी तेरा फुट अतिक्रमण असून ते २१ नंतर उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाच्या निर्णयानुसार गटाची हद्द व खुणा नुसार काढणार असल्याचे सांगितले होते. यावरून आ. रोहीत पवार संतप्त झाले होते. न्यायालयाने सांगितले प्रमाणे व्यापा-यांनी दहा फुट स्वत: काढले आहे. त्यामुळे न्यायालयाचा अवमान होणार नाही असे आ. रोहीत पवार म्हणाले. आ. रोहित पवार यांनी घेतलेल्या भुमिकेचे स्वागत व्यापा-यांनी केले आहे. यावेळी मुख्यधिकारी अजय साळवे , भुमिअभिलेखाचे गिरीश आवारे कार्यकर्ते नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शेतकऱ्यांना पाच हजार देण्याची थट्टा हेक्टरी एक लाख द्या

दुष्काळी परिस्थिती गंभीर असल्याने राज्य सरकारने शेतकऱ्यांना पाच हजार रुपये देण्याची घोषणा केली आहे. सदर मदत म्हणजे थट्टा आहे. एखाद्या नेत्याच्या घरी चहापाण्याचा खर्च पाच हजाराचा आहे. त्यामुळे सरकारने हेक्टरी एक लाख रूपये मदत द्यावी. अँडव्हान्स मध्ये ३० ते ३५ व म जुराला २५ हजार मदत द्यावी. याबाबत सरकारला एक आठवड्याची मुदत देत असून त्यांनी जास्तीचा निर्णय घेतला नाही तर राज्यात आंदोलन करणार असल्याची प्रतिक्रिया आ. रोहीत पवार यांनी दिली.

सेवा संकल्प अभियान अंतर्गत विशेष शिक्षकांचा राज्यस्तरीय सन्मान प्रमाणपत्र देऊन गौरव

मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते जिल्हा परिषद सभागृहात प्रमाणपत्र वितरण

ठाणे (समर्थ गांवकरी)



सेवा संकल्प अभियान अंतर्गत बौद्धिक अक्षमता असलेल्या विद्यार्थ्यांसोबत कार्यरत विशेष शिक्षकांना राज्यस्तरीय सन्मान प्रम ाणपत्रांचे वितरण दि. १६ ऑक्टोबर २०२६ रोजी जिल्हा परिषद ठाणे सभागृह येथे करण्यात आले. मुख्य कार्यकारी अधिकारी रणजित यादव यांच्या हस्ते ही प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. यावेळी समाज कल्याण विभाग प्रमुख उज्वला सकपाळ तसेच जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शिक्षक दिन २०२६ निमित्त दि. ३ सप्टेंबर २०२६ रोजी महाराष्ट्रातील विशेष शिक्षकांसाठी राज्यस्तरीय ऑनलाइन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी मार्गदर्शन करून राज्यातील विशेष शिक्षकांच्या योगदानाची दखल घेत त्यांचा गौरव केला. त्याच अनुषंगाने दिव्यांग सक्षमीकरण आयुक्तालय, पुणे यांच्या सूचनेनुसार ही प्रमाणपत्रे जिल्हास्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते वितरित करण्यात आली.

राज्यातील बौद्धिक अक्षम (मतिमंद प्रवर्ग) विशेष शाळांमध्ये सन २०१९ पासून दिशा अभियान राबविण्यात येत आहे. जय वकील फाउंडेशन अँड रिसर्च सेंटर, मुंबई यांनी तयार केलेल्या व छखएझखऊ या राष्ट्रीय संस्थेने प्रमाणित केलेल्या एकसमान अभ्यासक्रमाद्वारे ३ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर दिला जातो. वैयक्तिक शिक्षण कार्यक्रम (खएझ), बहुसंवेदी अध्यापन पद्धती, दिशा वेब पोर्टल आणि शिक्षक प्रशिक्षण हे या अभियानाचे प्रमुख घटक आहेत.

पाचट म्हणजे सोने! जाळण्याऐवजी कुजवा, एका एकरात दीड कोटी लिटर पाणी वाचवा

पाचटाच्या आच्छादनातून ८ पाणी पाळ्यांची बचत शक्य; विघ्नहरचे तज्ज्ञ संचालक विकास चव्हाण यांचे शेतकऱ्यांना आवाहन

जुन्नर (समर्थ गांवकरी)

श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरू झाल्याने जुन्नर-आळे परिसरात ऊसतोडणीला वेग आला आहे. मात्र यंदा पावसाने खंड दिल्याने व ऑक्टोबर हीट वाढल्याने आगामी काळात तीव्र पाणीटंचाईचे सावट आहे. अशा स्थितीत शेतकऱ्यांनी पाचट जाळण्याची घातक प्रथा थांबवून पाचटातूनच पाणी आणि जमिनीचे आरोग्य वाचवावे, असे आवाहन श्री विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे तज्ज्ञ संचालक विकास हरिभाऊ चव्हाण यांनी केले आहे.

चव्हाण यांनी सांगितले की, तोडणीनंतर शेतात मोठ्या प्रमाणात पाचट शिल्लक राहते. ते जाळल्यामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्ब, उपयुक्त जिवाणू आणि अन्नद्रव्ये जळून खाक होतात. जमीन कडक व नापीक होते. याउलट पाचटाचे योग्य व्यवस्थापन केल्यास त्यातील पोषणतत्वे पुन्हा जमिनीत मि सळतात.

कृषी अभ्यासानुसार उसाच्या पाचटामध्ये २८.६% सेंद्रिय कर्ब, ०.३५ ते ०.४२% नत्र, ०.०४ ते ०.१५% स्फ ुरद, ०.४२ ते ०.५०% पालाश तसेच कॅल्शियम, मॅग्नेशियम, गंधक व सूक्ष्म अन्नद्रव्ये असतात.

पाचट कुट्टी यंत्राने बारीक करून शेतात समान पसरल्यास जमिनीवर नैसर्गिक आच्छादन तयार होते. त्यामुळे सूर्यप्रकाश थेट जमिनीवर पडत नाही, बाष्पीभवन रोखले जाते व ओलावा जास्त काळ टिकतो.या आच्छादनामुळे आठ सिंचन पाळ्यांपर्यंत पाण्याची बचत होऊ शकते. एका एकरात सुम ारे दीड कोटी लिटर पाण्याची बचत होण्याचा दावा केला जातो. (प्रत्यक्ष बचत जमीन, हवामान व सिंचन पद्धतीवर अवलंबून)

आच्छानामुळे तण उगवत नाही, त्यामुळे खुरपणीचा खर्च वाचतो. पाचट कुजल्यानंतर जमीन भुसभुशीत होते, पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते. हा प्रयोग खोडवा उसासाठी अत्यंत फायदेशीर ठरतो.

पाचट लवकर कुजण्यासाठी त्याचे लहान तुकडे करणे, शेतात एकसारखे पसरवणे, ओलावा टिकवणे व गरजेनुसार जिवाणू संवर्धक वापरणे गरजेचे असल्याचेही चव्हाण यांनी सांगितले.



पाणीटंचाई, वाढता खर्च आणि बिघडलेले जमिनीचे आरोग्य ही आजच्या ऊस शेतीपुढील मोठी आव्हाने आहेत. त्यावर 'पाचट जाळणे टाळा, आच्छादन करा आणि थेंब थेंब पाणी वाचवा' हाच शाश्वत शेतीचा मंत्र आहे, असे आवाहन विकास चव्हाण यांनी शेवटी केले.

डॉ. सुभाष सोमण यांना राज्यस्तरीय 'आरोग्यदूत' पुरस्कार जाहीर

कोतूळच्या ज्येष्ठ वैद्यकीय सेवकाचा ५८ वर्षांच्या आरोग्यसेवेबद्दल होणार गौरव

अकोले (समर्थ गांवकरी)



ग्रामीण आणि दुर्गम आदिवासी भागात गेल्या ५८ वर्षांपासून अविरत वैद्यकीय सेवा देणारे कोतूळ येथील ज्येष्ठ वैद्यकीय व्यावसायिक डॉ. सुभाष केशव सोमण यांना स्वराज्य सरपंच सेवा संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय 'आरोग्यदूत' सन्मान पुरस्कार जाहीर झाला आहे. वयाच्या ८२ व्या वर्षीही रुग्णसेवेचे व्रत सुरू ठेवणाऱ्या डॉ. सोमण यांच्या कार्याचा या पुरस्काराच्या माध्यमातून गौरव करण्यात येणार आहे.

अहिल्यानगर येथे गुरुवार, दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी आयोजित राज्यस्तरीय सन्मान सोहळ्यात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून आपल्या कर्तृत्वातून आदर्श निम ण करणाऱ्या व्यक्तींना स्वराज्य सरपंच सेवा संघाच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानित केले जाते.

डॉ. सोमण यांनी वैद्यकीय क्षेत्रातील उच्च शिक्षणानंतर ग्रामीण तसेच दुर्गम आदिवासी भागातील नागरिकांना आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आपले आयुष्य सम र्पित केले. अनेक वर्षांपासून सुरू असलेली त्यांची रुग्णसेवा ही परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वपूर्ण ठरली आहे. वयाच्या ८२ व्या वर्षीही सेवाभाव जपत वैद्यकीय सेवा देत असल्याने त्यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. या पुरस्कार निवड समितीने त्यांच्या दीर्घकालीन वैद्यकीय सेवेची आणि सम ाजहितासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड केली आहे.

शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे आणि ग्रामसेवक नेते एकनाथराव ढाकणे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार असून, सरपंच सेवा संघाचे संस्थापक बाबासाहेब पावसे पाटील, प्रदेशाध्यक्ष रोहित संजय पवार तसेच अन्य मान्यवर उपस्थित राहणार आहेत. डॉ. सोमण यांना पुरस्कार जाहीर झाल्याने कोतूळसह अकोले तालुक्यातील नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन होत आहे.

स्व. अशोकराव मोरे दूध संस्थेच्या चेअरमनपदी बादशहा वाळुंज तर व्हा. चेअरमनपदी अनिल कर्पे



संगमनेर (समर्थ गांवकरी)

तालुक्यातील अतिशय प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पिंपळगाव कोंझिरा येथील स्व. अशोकराव मोरे दूध उत्पादक संस्था मर्यादितच्या चेअरमनपदी बादशहा वाळुंज तर व्हा. चेअरमनपदी अनिल कर्पे, तर ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी अक्षय आहेर यांची निवड झाली आहे.

पिंपळगाव कोंझिरा येथील स्व. अशोकराव मोरे दूध उत्पादक संस्था ही संगमनेर तालुक्यातील अग्रेसर दूध संस्थांपैकी एक म्हणून ओळखली जाते. या संस्थेमार्फत दररोज सुमारे पाच हजार लिटर दूध संकलित केले जाते. संस्थेची सुसज्ज व अद्ययावत इम ारत असून, परिसरातील दूध उत्पादक शेतकऱ्यांसाठी ही संस्था महत्त्वाची ठरली आहे.

नवनिर्वाचित चेअरमन बादशहा वाळुंज हे संगमनेर तालुका दूध संघाचे संचालक असून, त्यांनी पिंपळगाव कोंझिरा गावचे सरपंच म्हणूनही काम पाहिले आहे. गेल्या तीस वर्षांपासून ते गावच्या नेतृत्वात सक्रिय आहेत. व्हाईस चेअरमन अनिल कर्पे हे उत्कृष्ट दूध उत्पादक शेतकरी म्हणून परिचित आहेत. तर नवनिर्वाचित उपसरपंच अक्षय आहेर हे अभियांत्रिकी पदवीधर आहेत. तिन्ही पदाधिकाऱ्यांच्या निवडीमुळे गावातील सहकार क्षेत्र आणि ग्रामविकासाच्या कामांना नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा यावेळी व्यक्त करण्यात आली.

या सत्कारप्रसंगी बापूसाहेब कर्पे, बादशहा आहेर, विकास आहेर, राजेंद्र मोरे, सुभाष कर्पे, संदीप कर्पे, संगम आहेर, संतोष कर्पे, प्रथितयश कांदा व्यापारी अशोकशेठ कर्पे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय कर्पे, रोहिदास मोरे, सुनील कर्पे, विजय अडांगळे, मच्छिंद्र खर्डे आदी उपस्थित होते.


या तीनही नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे आमदार सत्यजितदादा तांबे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, एकविरा फाउंडेशनच्या संस्थापक डॉ. जयश्रीताई थोरात, दूध संघाचे माजी चेअरमन व जिल्हा बँकेचे नवनिर्वाचित संचालक रणजितसिंह देशमुख, कारखान्याचे व्हाईस चेअरमन पांडुरंग घुले, संगमनेर तालुका काँग्रेसचे अध्यक्ष अजय फटांगरे आणि माजी जिल्हा परिषद सदस्य रामहरी कातोरे यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

गोपाळचावडी कमान शेजारी विजया दशमी निमीताने,५१ फुटी दहातोंडी रावणाचे दहन, माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते

नवीन नांदेड (समर्थ गांवकरी)

गेल्या अनेक वर्षांपासून विजया दशमी दसरा निमित्ताने गोपाळचावडी कमान शेजारी हडको परिसरात आयोजक भाजपाचे नगरसेवक वैजनाथ देशमुख यांच्या वतीने दि २०ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता माजी मुख्यमंत्री तथा भाजपा खासदार अशोकराव चव्हाण , खासदार डॉ अजित गोपछडे, यांच्या सह मान्यवर पदाधिकारी यांच्या उपस्थितीत फटाक्यांची आतिषबाजी व ढोल ताशांच्या गजरात भावगित भक्ती गिताचा सुमधुर आवाजात रावण दहन कार्यक्रम आयोजीत करण्यात आला असून या कार्यक्रमाला नागरीक युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती राहण्याचे आवाहन करण्यात आले.

दरवर्षी प्रमाणे या १६ व्या वर्षी मनपाचे प्रभाग क्रमांक २० चे भाजपाचे नगरसेवक वैजनाथ देशमुख यांच्या वतीने हडको वाघाळा परिसरात गेल्या दहा दिवसांपासून हिंगोली येथील कलाकाराच्या सहाय्याने ५१ फुट दहा तोंडी रावण तयार करण्यात आले असून विजया दशमी दसरा निमित्ताने सायंकाळी सात वाजता माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण, खासदार डॉ अजितर गोपछडे, महापौर सौ.कविता संतोष मुळे,उपमहापौर दिपक सिंग रावत, मनपा स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंग गाडीवाले,मनपा सभागृह नेते ड.महेश कनकदंडे, माजी सभापती किशोर स्वामी,संजय कौडगे,चैतन्य बापु देशमुख,प्रविण साले,नगरसेवक संजय पाटील घोगरे,सौ. सुर्वणा सतिश बस्वदे,मंगला देशमुख,उदय देशमुख,उपसभापती निरंजना लांडगे,जनार्दन ठाकुर,माजी नगरसेवक संजय इंगेवाड, नगरसेवक प्रतिनिधी उदय देशमुख,राजु लांडगे सतिश बस्वदे,भाजपा सिडको मंडळ सचिन रावका, भाजपा पक्षाचे विविध आघाडी पदाधिकारी व मान्यवरांच्या उपस्थितीत हा रावण दहन सोहळा आयोजित करण्यात आला आहे.यावेळी विविध भक्ती भाव गिते सह फटाक्यांची आतिषबाजी ढोल ताशांच्या गजरात करण्यात येणार आहे.



या सोहळ्याला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन नगरसेवक तथा आयोजक वैजनाथ देशमुख यांनी केले आहे.

सातारा वैदू समाजाच्या वतीने अखिल महाराष्ट्र वैदू समाज विकास फाउंडेशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. स्वामी शिरकुल यांचा भव्य सत्कार!

सातारा (समर्थ गांवकरी)



अखिल महाराष्ट्र वैदू समाज विकास फाउंडेशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल डॉ. स्वामी शिरकुल यांचा सातारा वैदू समाजाच्या वतीने भव्य व उत्साहपूर्ण सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून साताऱ्याचे माजी नगरसेवक विजय भाऊ काळोखे, संतोष साळुंखे तसेच पंचप्रमुख सुरेश शिर्के, उत्तम शिर्के, अमर गुडे, दशरथ पाटील, प्रकाश वैदू, अनिल वरगंटे, रामा वरगंटे, शंकर वरगंटे, राजू शिर्के आणि अरुण शिर्के यांच्यासह समाजातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी सातारा वैदू समाजातील महिला मंडळ, कार्यकर्ते आणि सम ाजबांधवांच्या वतीने डॉ. स्वामी शिरकुल यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रम ाच्या यशस्वी आयोजनासाठी सुशांत, अथर्व, अनुज, अर्जुन, करण, आकाश, रोहित, विकी, योगेश, अवि, पवन, राजा यांच्यासह इतर कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच सोनी, जया, उषा, स्मिता, सुनीता, निलोफर, सुनंदा, शांताबाई, ललिता, पद्मा आणि लता यांच्यासह महिला मंडळाने उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या आनंदाच्या प्रसंगी विश्वशांती कला-क्रीडा मंडळ, सातारा येथील महिला बांधवांना डॉ. स्वामी शिरकुल यांच्या हस्ते साडीवाटप करण्यात आले. समाजातील एकोपा, बंधुभाव आणि सामाजिक कार्याला प्रोत्साहन देणारा हा सोहळा उत्साहात पार पडला. डॉ. स्वामी शिरकुल यांनी साताऱ्यात उपस्थित राहून समाजाचा सन्मान स्वीकारल्याबद्दल सातारा वैदू समाजाच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार मानण्यात आले.

अहमदपूर मधील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या कुटुंबियाची केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी घेतली सांत्वनपर भेट

रिपब्लिकन पक्षातर्फे केली आर्थिक मदत



मुंबई (समर्थ गांवकरी)

लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील खंडाळी गावातील तरुण शेतकरी गजानन नागोराव देमगुंडे यांनी दुष्काळामुळे शेतीचे नुकसान झाल्यामुळे आत्महत्या केल्याची दुःखद दुर्घटना घडली. त्यांच्या निवासस्थानी आज रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना रामदास आठवले यांनी संत्वानपर भेट घेतली.त्यांचे वृद्ध वडील नागोराव आणि त्यांचे दोन मुले यांचे ना. रामदास आठवले यांनी सांत्वन केले.यावेळी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने दिवंगत शेतकरी गजानन देमगुंडे यांच्या परिवाराला रुपये ५० हजाराची रोख रक्कम सांत्वनपर मदत ना.रामदास आठवले यांच्या हस्ते देण्यात आली असल्याची माहिती रिपब्लिकन पक्षाचे लातूर जिल्हा अध्यक्ष बाबासाहेब कांबळे यांनी दिली.

थोडक्यात पण महत्त्वाचे

आंबेगाव वसाहत येथे यशवंतराव चव्हाण विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा



मंचर (समर्थ गांवकरी)

आंबेगाव वसाहत ता.आंबेगाव येथील यशवंतराव चव्हाण माध्यमिक विद्यालयात भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.अशी माहिती मुख्याध्यापक पी.डी.चव्हाण यांनी दिली. या निमित्ताने आयोजित केंद्रस्तरीय स्पर्धांमध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. हस्ताक्षर स्पर्धेत इयत्ता सातवीतील तेजस्विनी भवारी आणि इयत्ता दहावीतील प्रिया आंबेकर यांनी प्रथम क्रमांक मिळविला.चित्रकला स्पर्धेत इयत्ता सातवीतील आराध्या सुरकुले हिने द्वितीय क्रमांक पटकाविला.यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.वाचनाची आवड निर्माण व्हावी,विद्यार्थ्यांची सर्जनशीलता वाढावी आणि त्यांच्यातील सुप्त गुणांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

पारनेर येथे मोफत नेत्र तपासणी व चष्मा वाटप शिबिर

पारनेर (समर्थ गांवकरी)

स्वर्गीय रघुनाथ बाबुराव चेडे आणि स्वर्गीय फुलाजी बाबुराव चेडे यांच्या पुण्यस्मरणानिमित्त मोफत नेत्र तपासणी व चष्मा वाटप शिबिर आयोजित करण्यात आले आहे. सर्व नागरिक व नेत्ररुग्णांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. हे शिबिर गुरुवार, २२ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १०:०० ते दुपारी २:०० या वेळेत हॉटेल ऋषिकेश, सुपा रोड, पारनेर येथे होणार आहे. वैद्यकीय सहकार्य मोहन ठोसे नेत्र रुग्णालय (तालुका जुन्नर, जिल्हा पुणे, नारायणगाव) यांचे आहे. अनुभवी डॉक्टर आणि आधुनिक यंत्रसामग्रीच्या मदतीने नागरिकांची नेत्र तपासणी केली जाईल. गरजू रुग्णांना मोफत चष्मा वाटपही केले जाणार आहे. आयोजन मा. चंद्रकांत रघुनाथ चेडे (अध्यक्ष – किसान युनियन पारनेर), अशोक फुलाजी चेडे (नगरसेवक, कोमल उद्योग समूह) आणि कुणाल एकनाथ पोते (साई नंदन प्लायवुड) यांनी केले आहे. शिबिरास किसान इंटरनॅशनल स्कूल अँड ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स, पारनेर; किसान कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, पारनेर; किसान लॉ कॉलेज, पारनेर तसेच किसान युनियन पतसंस्था, पारनेर यांचे सहकार्य लाभले आहे. ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना नेत्र आरोग्याबाबत जागरूकता आणि वेळेवर उपचार उपलब्ध होत नाहीत. या शिबिरामुळे पारनेर आणि परिसरातील नागरिकांना घरबसल्या जवळच दर्जेदार नेत्र तपासणीची संधी मिळणार आहे. आयोजकांनी नागरिकांना वेळेवर उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. नेत्र आरोग्य हा जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. अशा सामाजिक उपक्रमांमुळे समाजातील गरजूंना मदत होते आणि दिवंगत व्यक्तींच्या स्मृतीला योग्य सन्मान मिळतो. पारनेरवासीयांनी या मोफत शिबिराचा जरूर लाभ घ्यावा.



किरण आहेर यांना पीएच.डी. प्रदान



पारनेर (समर्थ गांवकरी)

आणे (ता. जुन्नर) येथील किरण आहेर यांनी यांत्रिकी इंजिनीअरिंग विषयात पीएच.डी. पदवी यशस्वीरीत्या संपादन केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. डॉ. किरण आहेर यांनी शैक्षणिक प्रवासात ज्ञान, संशोधन आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाप्रती असलेली निष्ठा जपत हे महत्त्वपूर्ण यश मिळवले. यांत्रिकी इंजिनीअरिंगसारख्या तांत्रिक विषयात पीएच.डी. पदवी प्राप्त केल्याने त्यांच्या शैक्षणिक कारकिर्दीत महत्त्वाची भर पडली आहे. त्यांच्या या यशाबद्दल मातोश्री शैक्षणिक संस्थेचे पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक आणि कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. उच्च शिक्षण आणि संशोधन क्षेत्रातील त्यांची ही कामगिरी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. डॉ. किरण आहेर यांनी भविष्यातही संशोधन आणि शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. त्यांच्या यशामुळे आणे व टाकळी ढोकेश्वर परिसरातून त्यांचे विशेष कौतुक होत आहे.

जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार आवारासाठी नान्नज येथे २.४० हेक्टर शासकीय जमीन मंजूर!

बाजार समिती सभापती पै. शरद कार्ले व संचालक मंडळाच्या मागणीला यश

जामखेड (समर्थ गांवकरी)

नान्नज येथे उपबाजार व्हावा यासाठी गेली तीन वर्षांपासून केलेल्या पाठपुराव्याला आता मोठे यश आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या सूचनेनुसार २.४० हेक्टर शासकीय जमीन मंजूर करण्यात आल्याची माहिती जामखेड बाजार समितीचे सभापती पै. शरद कार्ले यांनी दिली आहे.

जामखेड तालुक्यातील नान्नज येथील २ हेक्टर ४० आर शासकीय जमीन जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीला उपबाजार आवार उभारण्यासाठी नाममात्र १ रुपये कब्जेहक्क रकम वर प्रदान करण्यास महसूल विभागाने मान्यता दिली आहे.

नान्नज हे अंतर जामखेड पासून पंधरा ते सतरा किलोमीटर इतके असून तेथील शेतकऱ्यांना जामखेड बाजारळक्ष समितीत आपला शेतमाल आणण्यासाठी अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. तसेच वाहतूक खर्च ही करावा लागत होता. किंवा बाजार समितीचे लायसन नसलेल्या इतर दुकानदारांकडे विक्री करावा लागत होता. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची समोर आले. या पार्श्वभूमीवर नान्नज परिसरातील शेतकऱ्यांच्या मागणीनुसार विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जामखेड बाजार समितीचे सभापती पै. शरद कार्ले यांनी उपसभापती व संचालक मंडळ यांची बैठक घेऊन नान्नज येथे उपबाजार समिती सुरू करण्यासाठी जागा उपलब्ध करून द्यावी यासाठी सरकारकडे पाठपुरावा केला. गेली तीन वर्षापासून करत असलेल्या या पाठपुराव्याला नुकतेच मोठे यश आले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार आवारासाठी नान्नज येथे २.४० हेक्टर शासकीय जमीन मंजूर करण्यात आल्याचा शासन निर्णय काढण्यात आला आहे. या निर्णयामुळे नान्नज



परिसरातील शेतकऱ्यांना कृषी मालाच्या खरेदी-विक्रीसाठी सुविधा उपलब्ध होऊन स्थानिक कृषी व्यापाराला चालना मिळणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे साहेब यांचे आभार मानले आहेत.

वसंत लोढा यांना जिल्हा बँकेसाठी उमेदवारी देण्याची शिष्टमंडळाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

अहिल्यानगर (समर्थ गांवकरी)

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेसाठी जिल्ह्यातील शिष्टमंडळ मा.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना नागपूर येथे नुकतेच भेटून आले.या शिष्टमंडळाने देवेंद्रजी यांना पतसंस्था मतदारसंघातून वसंत लोढा यांना उमेदवारी दिली जावी.अशी विनंती केली आहे.यावेळी भाजपचे माजी शहर जिल्हाध्यक्ष अभय आगरकर,ज्येष्ठ नेते सुनील रामदासी,सचिन पारखी व भाजपचे ज्येष्ठ नेते तथा नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा आदी उपस्थित होते.

अहिल्यानगर जिल्हा सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रीया सुरू झाली असून, नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा यांनी बिगरशेती व पतसंस्था मतदार संघातून निवडणूक लढविण्याची गेली ३ वर्षेपासून तयारी करीत आहेत.

संस्थापक व अध्यक्ष म्हणून वसंत लोढा हे पंडित दिनदयाळ पतसंस्थेच्या माध्यमातून ३५ वर्षापासून मी सहकारात कार्यरत आहे.महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशन १० वर्षे संचालक पदावर कार्यरत,संस्थापक व अध्यक्ष म्हणून नाशिक विभागीय पतसंस्था फेडरेशन ९ वर्षापासून कार्यरत, बिगरशेती मतदार संघात पतसंस्थेचे ६६५ मतदार तसेच मजुर संस्थांचे ५३५ मतदार आहेत. गेल्या ६ महिन्यांपासून अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात पतसंस्थांचे मेळावे,



प्रशिक्षण कार्यशाळा, घेवून मतदार संघ पुर्णपणे संपर्कात आणला आहे.यामुळे श्री.लोढा यांचा असलेला दांडगा अनुभव व संस्थापक बांधणी पहाता माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वसंत लोढा यांना जिल्हा बँकेच्या बिगर शेती मतदार संघातून उमेदवारी मिळवून दिली. तर भा.ज.पा. च्या निष्ठावाण कार्यकत्याला संधी मिळेल.ही जागा बहुमताने जिंकुन पक्षाच्या झोळीत नक्की टाकेल.असा विश्वास वसंत लोढा यांनी व्यक्त केला.

नवरात्रीत श्रीरामपूर पोलिसांचा अनोखा उपक्रम

९१७ महिला तक्रारदारांशी थेट संपर्क, ७१ महिलांना अद्यापही त्रास!

श्रीरामपूर (समर्थ गांवकरी)

महिला व मुलींच्या सुरक्षिततेची खात्री करण्यासाठी श्रीरामपूर विभागाच्या पोलिसांनी नवरात्री उत्सवाच्या काळात अनोखा उपक्रम राबविला. मागील दोन वर्षांत महिला व मुलींवरील गंभीर गुन्ह्यांमध्ये तक्रार दाखल केलेल्या महिलांशी थेट संपर्क साधून पोलिसांनी केलेल्या कारवाईचा आढावा घेतला. या उपक्रम ातून ८४६ महिला व मुलींनी पोलिसांच्या कारवाईबाबत समाधान व्यक्त केले, तर ७१ महिलांनी आरोपींकडून अद्यापही त्रास होत असल्याचे सांगितले. संबंधित आरोपींवर कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

श्रीरामपूर विभागातील १७ पोलीस ठाण्यांच्या हद्दीत सन २०२५ आणि २०२६ या दोन वर्षांत बलात्काराचे २५१ आणि विनयभंगाचे ६६६ असे एकूण ९१७ गुन्हे





दाखल झाले आहेत. या गुन्ह्यांतील तक्रारदार महिलांशी संपर्क साधण्यासाठी महिला पोलीस उपनिरीक्षकांच्या नेतृत्वाखाली विशेष महिला पथक तयार करण्यात आले. या पथकाने महिलांना फोन करून त्यांच्या तक्रारींवर योग्य कारवाई झाली का, संबंधित आरोपींकडून पुन्हा त्रास दिला जात आहे का, तसेच पाठलाग किंवा अन्य गैरप्रकार सुरू आहेत का, याची माहिती घेतली. यामध्ये ८४६ महिलांनी पोलिसांच्या कारवाईबद्दल समाधान व्यक्त केले, तर ७१ महिलांनी अद्यापही त्रास होत असल्याचे सांगितले.

महिलांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत त्रास सुरू असल्याचे सांगणाऱ्या तक्रारदार महिलांच्या प्रकरणांवर पोलीस प्रशासन स्वतः लक्ष ठेवणार असून, संबंधित आरोपींविरुद्ध सात दिवसांत गंभीर प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येणार आहेत. आवश्यकतेनुसार नव्याने गुन्हेही दाखल केले जाणार आहेत. पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन आणि अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे यांच्यासह म हिला पोलीस कर्मचाऱ्यांनी हा उपक्रम राबविला. नवरात्रीतील स्त्रीशक्तीच्या जागरासोबतच म हिलांच्या सुरक्षिततेचा प्रत्यक्ष आढावा घेणारा हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला आहे.

पिंपळगाव तुर्क येथील मुस्लीम कब्रस्तान पाणी टाकी व पाइपलाईन कामाचा शुभारंभ



पारनेर (समर्थ गांवकरी)

रविवार दि. १९ ऑक्टो. २०२६ अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रविकास २०२५-२६ अंतर्गत पिंपळगाव तुर्क येथील मुस्लीम कब्रस्तान येथे पाणी टाकी व पाईप लाईनच्या कामाचा शुभारंभ पारनेर – नगर विधानसभा मतदारसंघाचे आम दार काशिनाथ दाते सर यांच्या शुभ हस्ते संपन्न झाला.

यावेळी बोलताना आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले, गावाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल, तर रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण आणि मूलभूत सुविधांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. पिंपळगाव तुर्कच्या विकासासाठी विविध पदांवर कार्यरत असताना निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला. विकासकामे करताना कोणताही भेदभाव न करता सर्व समाजघटकांच्या गरजा लक्षात घेऊन काम करणे, हीच माझी भूमिका सातत्याने राहिली आहे.

गावातील नागरिकांच्या सहकार्यामुळे विकासकामांना गती मिळते. यापुढेही पिंपळगाव तुर्कसह संपूर्ण मतदारसंघातील नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आणि आवश्यक विकासनिधी उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहीन.

पिंपळगाव तुर्कच्या विकासासाठी विविध टप्प्यांवर करण्यात आलेली कामे आणि निधीची उपलब्धता ही गावाच्या प्रगतीतील महत्त्वाची बाब ठरली आहे. आगामी काळातही विकासकामांना गती देऊन नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी उस्मान पटेल, हकीम शेख, शफिक शेख, अबूबकर शेख, फैय्याज शेख, रियाज शेख, शकील शेख, मुबारक शेख, सुशील वाळुंज, स्वप्नील वाळुंज यांच्यासह मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

> पिंपळगाव तुर्कच्या विकासाचे खरे शिल्पकार आमदार काशिनाथ दाते सरच आहेत. गावातील म लूभूत सुविधांसाठी त्यांनी सातत्याने निधी उपलब्ध करून दिला. त्यांच्या विकासाभिमुख दृष्टिकोनामुळे गावाच्या प्रगतीला मोठी चालना मिळाली आहे.
>
> –गोकुळ वाळुंज (माजी सरपंच)

पारनेर शहरातील १ कोटी ७५ लाखांच्या विकासकामांना सुरुवात

आमदार दाते सरांच्या शुभहस्ते भूमिपूजन

पारनेर (समर्थ गांवकरी)

सोमवार दि. १९ आक्टो. २०२६ पारनेर शहरातील मूलभूत सुविधांना चालना देण्यासाठी आमदार काशिनाथ दाते सर यांच्या विशेष प्रयत्नांतून मंजूर झालेल्या एकूण १ कोटी ७५ लाख रुपयांच्या विविध रस्ते विकासकामांचा भूमिपूजन समारंभ आमदार दातेंच्या शुभहस्ते झाला. या विकासकामांमुळे शहरातील विविध वस्त्यांमधील रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार असून, नागरिकांच्या दैनंदिन दळणवळणाला अधिक सुविधा मिळणार आहेत.

या विकासकामांमध्ये पारनेर नगरपंचायतीच्या प्रभाग क्रमांक २ मधील व्यवहारें वस्ती ते साहेबराव गायकवाड वस्ती रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी २० लाख रुपये, प्रभाग क्रमांक ३ मधील जामगाव रस्त्यापासून विजय औटी यांच्या घरापर्यंत रस्त्यासाठी ४० लाख रुपये मंजूर झाले आहेत. तसेच औटी वस्ती ते ताटळवाडी रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी १५ लाख रुपये, महाजन वस्ती ते दादाभाऊ गायकवाड घर रस्त्याच्या डांबरीकरणासाठी २० लाख रुपये, लोणी रोड ते अंबुले वस्ती रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठी ४० लाख रुपये आणि जामगाव रस्त्यापासून ताटळवाडी मारुती मंदिर रस्त्याच्या सुधारणेसाठी ४० लाख रुपये अशा एकूण १ कोटी ७५ लाख रुपयांच्या कामांचा यामध्ये समावेश आहे.

यावेळी आमदार काशिनाथ दाते सर म्हणाले, पारनेर शहरातील नागरिकांना चांगल्या दर्जाचे रस्ते आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिकता आहे. नागरिकांना रोजच्या प्रवासात होणारा त्रास कमी व्हावा, वस्त्यांना जोडणारे रस्ते सुस्थितीत व्हावेत आणि शहराच्या विकासाला गती मिळावी, या उद्देशाने या काम ांसाठी सातत्याने पाठपुरावा केला. या विकासकामांना मंजुरी मिळून आज प्रत्यक्ष कामांचा शुभारंभ होत आहे, याचे समाधान आहे.

विकास हा केवळ आश्वासनांपुरता मर्यादित न राहता प्रत्यक्ष कामातून नागरिकांना अनुभवता आला पाहिजे. मंजूर झालेली सर्व कामे दर्जेदार पद्धतीने आणि नियोजित वेळेत पूर्ण व्हावीत, यासाठी संबंधित यंत्रणांनी दक्षता घ्यावी. नागरिकांच्याही विकासकामांबाबत काही सूचना असतील, तर त्या जाणून घेऊन कामे अधिक चांगल्या पद्धतीने करण्याचा आमचा प्रयत्न राहील. पारनेर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी मी सातत्याने प्रयत्नशील राहीन.

या कार्यक्रमास जिल्हा बँकेचे माजी संचालक प्रशांत गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य वसंतराव चेडे, उद्योजक दिलीप दाते, माजी उपनगराध्यक्ष दत्ताशेठ कुलट, विठ्ठलशेठ कावरे, नगरसेवक अशोक चेडे, युवराज पठारे, नवनाथ सोबले, देवराम ठुबे, कांतीलाल ठाणगे,



राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, भाजपचे जिल्हा सरचिटणीस सुभाष दुधाडे, शहर उपाध्यक्ष सुनील गाडगे, उद्योजक मंगेश दाते, महिला शहराध्यक्षा कविता औटी, सुनिताताई सोबले, सोनाबाई चौधरी, शंकर औटी, रभाजी औटी, मारुती शेरकर, अण्णा औटी, अंबुले सर, दत्ता अंतुले, नितीन औटी, दादाभाऊ गायकवाड, गोरख गायकवाड, संजय औटी, प्रवीण औटी, सहदेव तराळ, शांताराम तराळ, अशोक गायकवाड, दयानंद बढे, विनोद बढे, रोहिदास शेरकर, बाळासाहेब देशमाने, नितीन तराळ, मारुती औटी, अभिषेक औटी, अरुण देशमाने, सुभाष देशमाने, शिवाजी देशमाने, प्रदीप नगरे, त्रिंबक औटी आदी मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

पारनेर शहरातील रस्त्यांची गुणवत्ता सुधारणे, नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुलभ करणे आणि मूलभूत सुविधांचा विस्तार करणे, या दृष्टीने ही विकासकामे महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. मंजूर कामे वेळेत आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण झाल्यास शहरातील नागरिकांना त्याचा थेट लाभ मिळणार आहे

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : अ-१, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)/
कोकण विभागीय कार्यालयाचा पत्ता : शकुंतल बिल्डिंग, गाळा क्र. २, सेक्टर ५, कोपरखैरणे, नवी मुंबई ४००७०९